दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक २२ । शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

## लोकतंत्र वाचवा, अराजकता हटवा!
### संवैधानिक संस्थांवरील आरोपांविरोधात भाजपचा ५ नोव्हेंबरला नागपुरात मोर्चा



**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देशातील संवैधानिक संस्थांविरोधात विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या आरोपांच्या निषेधार्थ भाजपने नागपुरात मोर्चाचे आयोजन केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ५ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता यशवंत स्टेडियम ते व्हेरायटी चौक असा मोर्चा काढण्यात येणार आहे. 'लोकतंत्र वाचवा, अराजकता हटवा' असे मोर्चाचे नामकरण करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपचे लोकप्रतिनिधी व पदाधिकारी सहभागी होणार आहेत. मोर्चात १० हजारांहून अधिक कार्यकर्ते सहभागी होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## ८६ हजार कोटींच्या थकीत देयकांसाठी कंत्राटदारांचे राज्यव्यापी फोन आंदोलन

- ३५ जिल्ह्यांतून मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयांत दूरध्वनींचा भडिमार
- दिवाळीपूर्वी निधी देण्याची मागणी

**श्रीगोंदा :** राज्यातील कंत्राटदारांची तब्बल ८६ हजार कोटी रुपयांची देयके प्रलंबित असल्याच्या प्रश्नावर शुक्रवारी (दि.३०) राज्यव्यापी फोन आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या आंदोलनात ३५ जिल्ह्यांतील कंत्राटदारांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांच्या कार्यालयांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधत थकीत बिलांचा प्रश्न उपस्थित केला.

शासकीय विकासकामे पूर्ण करूनही गेल्या दोन वर्षांपासून मोबदला मिळत नसल्याने कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. साहित्य पुरवठादारांची देणी, बँकांचे हप्ते, मजुरांची मजुरी आणि वाढते व्याज यामुळे त्यांच्यावरील आर्थिक ताण वाढला आहे. वारंवार निवेदने देऊन आणि पाठपुरावा करूनही ठोस निर्णय होत नसल्याने कंत्राटदारांनी थेट मंत्रालयातील

कार्यालयांना फोन करून जाब विचारला.

सकाळी दहा वाजल्यापासून सुरू झालेल्या आंदोलनात 'आमची बिले कधी मिळणार?', 'आणखी किती दिवस कर्जाचे हप्ते भरायचे?' असे सवाल उपस्थित करण्यात आले. अनेक ठिकाणी दूरध्वनी व्यस्त येणे, प्रतिसाद न मिळणे आणि जबाबदारी दुसऱ्या कार्यालयाकडे सोपविण्यात येत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

नऊ कंत्राटदारांच्या आत्महत्यांचा मुद्दा ऐरणीवर

आर्थिक विवंचनेतून राज्यातील नऊ कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याची गंभीर बाब संघटनांनी मांडली. थकीत देयकांमुळे हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम, जलजीवन मिशन, आदिवासी विकास, ग्रामविकास आणि नगरविकास विभागांतील प्रलंबित देयकांसाठी दिवाळीपूर्वी निधी उपलब्ध करून प्रत्यक्ष रक्कम कंत्राटदारांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी आहे. येत्या दोन ते चार दिवसांत निर्णय न झाल्यास अधिक तीव्र राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनांनी दिला.'आम्ही शासनाकडे भीक मागत नसून पूर्ण केलेल्या (पान ४ वर)

# शाहरुख, अजय देवगण, टायगर श्रॉफला 'विमल इलायचीचा त्रास'!
### जाहिरातीत नियमांचे उल्लंघन झाल्याचे एफडीएचे निरीक्षण; तिघांवर होणार कायदेशीर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** लोकप्रियतेच्या जोरावर उत्पादनांची जाहिरात करणाऱ्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्यांना आता कायद्याच्या कचाट्यात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अभिनेता शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांनी 'विमल इलायची'ची जाहिरात करताना नियमांचे उल्लंघन केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) निरीक्षणात समोर आले आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिल्याने चित्रपटसृष्टीसह जाहिरात क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

'विमल इलायची'च्या जाहिरातींच्या माध्यमातून प्रतिबंधित पान मसाल्याचा अप्रत्यक्ष प्रचार होत असल्याचा आक्षेप एफडीएने घेतला होता. याप्रकरणी संबंधित तिन्ही अभिनेत्यांना काही महिन्यांपूर्वी नोटीस बजावण्यात आली

होती. त्यानंतर अभिनेत्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. मात्र, त्यांच्या स्पष्टीकरणानंतरही जाहिरात करताना नियमांचे उल्लंघन झाल्याचे संबंधित सहाय्यक आयुक्तांच्या निरीक्षणात निष्पन्न झाल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणाचा पुढील निर्णय घेण्याचा अधिकार असलेल्या सहआयुक्तांकडे हे प्रकरण सोपविण्यात येणार आहे. पुढील आठवड्यापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होऊन त्यांच्यासमोर कायदेशीर कार्यवाही सुरू होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, अभिनेता अजय देवगण यांनी या कारवाईच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याची माहितीही मुंढे यांनी दिली.

**जाहिरातीच्या आडून पान मसाल्याचा प्रचार?**

राज्यात पान मसाल्याचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर प्रतिबंध लागू आहेत. 'विमल इलायची' हे स्वतंत्र उत्पादन आहे की पान मसाला व तंबाखू उत्पादनाच्या ब्रँडचा विस्तार आहे, याबाबत एफडीएने प्रश्न उपस्थित केला आहे. ऑगस्टमध्ये बजावलेल्या नोटिशीत संबंधित जाहिरातींचा प्रचार थांबविणे, सोशल मीडियावरील जाहिराती हटविणे आणि उत्पादनासंबंधी आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

**सेलिब्रिटींची जबाबदारी ऐरणीवर**

लाखो तरुणांचे अनुकरणीय व्यक्तिमत्त्व असलेल्या अभिनेत्यांनी जाहिराती स्वीकारताना उत्पादनाचे स्वरूप आणि त्याचे सामाजिक परिणाम तपासण्याची जबाबदारी आहे का, हा प्रश्न या प्रकरणामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. केवळ जाहिरातीचे मानधन महत्त्वाचे की सामाजिक उत्तरदायित्वही जपायचे, यावर आता नव्याने चर्चा सुरू झाली आहे. आता सहआयुक्तांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जागेच्या नोंदीसाठी १ लाख २५ हजारांची लाच! ग्राम पंचायत अधिकाऱ्यावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** स्वतःच्या हक्काची जागा खरेदी केली, मात्र त्या जागेची ग्रामपंचायत दप्तरी नोंद करण्यासाठीही लाखो रुपयांची लाच द्यावी लागणार असेल, तर सामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कोणाकडे? असा संतप्त सवाल उपस्थित करणारा प्रकार काष्टी येथे उघडकीस आला आहे. खरेदी केलेल्या जागेची नोंद आणि संमतीपत्र देण्यासाठी तब्बल १ लाख २५ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी शरद साहेबराव कवडे (वय ५३) यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सरकारी काम की लाचेचा बाजार?**

सामान्य नागरिकाला आपल्या मालमत्तेची नोंद करण्यासाठी सरकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. त्यातच अशा कामांसाठी लाखोंची मागणी होत असल्याचे प्रकार समोर येत असतील, तर ग्रामपंचायत स्तरावरील पारदर्शक कारभाराचा प्रश्न ऐरणीवर येतो. काष्टीतील या प्रकरणामुळे ग्रामपंचायत प्रशासनातील कामकाजाची सखोल चौकशी करण्याची मागणी होण्याची शक्यता आहे.

तक्रारदाराच्या वडिलांनी काष्टी येथील सिटी सर्व्हे क्रमांक १८९ मधील ४०.३५ चौरस मीटर बांधकाम व मोकळी जागा खरेदी केली होती. या जागेच्या खरेदीखताची ग्रामपंचायत दप्तरी नोंद करून संमतीपत्र मिळविण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी कवडे यांनी १ लाख २५ हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती.तक्रारीची १४ ऑक्टोबर (पान ४ वर)

**महत्त्वाचे..**

### राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे विद्यापीठाचा शनिवारचा पेपर रद्द

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांमधील शनिवार (दि. ३१) रोजीचा नियोजित पेपर रद्द करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा २०२६-२७ च्या ध्वजारोहण कार्यक्रमासाठी राष्ट्रपतींचा दौरा असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांत शनिवारी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. मात्र, राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे नाशिक जिल्ह्यात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन परीक्षा विभागाने हा निर्णय घेतला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. राजेंद्र तलवारे यांनी याबाबत माहिती दिली.

## कर्जत, अकोले, पारनेरमध्ये दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला..!
### जिल्हा बँकेच्या निवडणुकीत विखे-थोरात विरुद्ध शिंदे-लंके लढती रंगणार

- २ नोव्हेंबरला मतदान
- महिला व अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातही चुरस
- ३८३७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क
- उमेदवारांकडून मतदारांच सहल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीने जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, कर्जत, अकोले आणि पारनेर या सेवा संस्था मतदारसंघांतील लढतींकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. महिला तसेच अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातील लढतीही चर्चेचा विषय ठरत आहेत. एकूण ३ हजार ८३७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून, अवघ्या काही जागांसाठी राजकीय नेत्यांनी प्रतिष्ठा पणाला लावली

आहे. अटीतटीच्या मतदारसंघांतील मतदारांना सहलीवर पाठविण्याची रणनीतीही उमेदवारांनी अवलंबली आहे.

बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी २ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या निवडणुकीत भाजपचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात प्रथमच एकत्र आले आहेत. त्यांच्या पॅनलविरोधात विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, खासदार नीलेश लंके आणि माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्या नेतृत्वाखालील उमेदवार रिंगणात आहेत.

बिनविरोध झालेल्या ११ जागांपैकी १० जागा विखे-थोरात गटाला, तर एक जागा राम शिंदे गटाला मिळाली. आता उर्वरित १० जागांसाठी २७ उमेदवारांमध्ये लढत होत आहे. त्यामुळे बँकेवरील वर्चस्वाच्या राजकीय समीकरणांना या निवडणुकीत महत्त्व प्राप्त झाले आहे.कर्जतमध्ये राम शिंदे समर्थक ज्योती प्रकाश शिंदे आणि विखे समर्थक तुषार पिसाळ यांच्यात सामना आहे. अकोल्यात आमदार डॉ. किरण लहामटे विरुद्ध संजीवनी शिंदे अशी लढत असून, वैभव पिचड आणि अमित भांगरे समर्थकांची भूमिका निर्णायक ठरू शकते. पारनेरमध्ये खासदार नीलेश लंके यांच्याविरोधात विखे समर्थक राहुल शिंदे मैदानात असल्याने या लढतीला विखे-लंके संघर्षाचे स्वरूप आले आहे.

महिला मतदारसंघात हर्षदा काकडे, अनुराधा नागवडे आणि संगीता वाघ यांच्यात चुरस आहे. अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघात वैभव पिचड आणि प्रसाद लोखंडे यांच्यातील लढतीकडे (पान ४ वर)

## प्रतिबंधित तंबाखू प्रकरणी 'एफडीए'चे चार अधिकारी निलंबित

**२१ अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी; मंत्री नरहरी झिरवाळ**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांवरील कारवाईत कथित अनियमितता आणि अधिकाऱ्यांच्या भूमिकेतील त्रुटींची गंभीर दखल घेत राज्य शासनाने अन्न व औषध प्रशासनातील (एफडीए) चार अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. तसेच आणखी २१ अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. दोन कंपन्यांशी संबंधित प्रकरणांत (पान ४ वर)

## शिर्डीत उपवर्गीकरणाविरोधात हजारो भीमसैनिकांचा महामोर्चा
### मातंग समाजाला विरोध नाही, भाजप सरकारच्या धोरणांना विरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून राज्यातील सामाजिक वातावरण तापले असतानाच शिर्डीत हजारो भीमसैनिकांचा महामोर्चा काढण्यात आला. उपवर्गीकरणाच्या विरोधात आयोजित या महामोर्चानंतर झालेल्या जाहीर सभेत वक्त्यांनी भाजप सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका करत आपला आक्रमक पवित्रा स्पष्ट केला.

काही दिवसांपूर्वी शिर्डीत मातंग समाजाच्या वतीने महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चातील काही वक्त्यांनी बौद्ध समाजाबद्दल अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका केल्याचा आरोप आता आंबेडकरी समाजातील आंदोलकांकडून करण्यात येत आहे. या वक्तव्यांमुळे समाजात नाराजी निर्माण झाली असून त्याचे पडसाद शिर्डीतील या महामोर्चात उमटल्याचे चित्र पाहायला

मिळाले.यावेळी वक्त्यांनी स्पष्ट केले की, आमचा विरोध मातंग समाजाला नाही. मातंग समाज हा आमचाच बांधव आहे. मात्र, आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या राजकीय धोरणांना आणि भाजप सरकारच्या भूमिकेला आमचा विरोध आहे. सरकार पुरस्कृत पद्धतीने मातंग समाजाचे मोर्चे काढले जात असल्याचाही आरोप काही वक्त्यांनी केला.आरक्षणाचे उपवर्गीकरण कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, असा निर्धार जाहीर सभेत व्यक्त करण्यात आला. तसेच मातंग समाजातील काही वाचाळ वक्त्यांनी बौद्ध समाजाविषयी केलेल्या वक्तव्यांना यापुढे जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशारा यावेळी सर्वच वक्त्यांनी दिला. यावेळी जेष्ठ विचारवंत अँड . सुरेश माने हे आपल्या भाषणात म्हणाले की,२०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये (पान ४ वर)

# मायक्रोसॉफ्टचा निर्णय पतसंस्थांसाठी धोक्याची घंटा की बदलाची संधी?

अतिथी संपादकीय । श्री. वासुदेव काळे, ९५५२६०७६४६

जगातील बलाढ्य तंत्रज्ञान कंपन्यांपैकी एक असलेल्या मायक्रोसॉफ्टने सुमारे ६० हजार पात्र कर्मचाऱ्यांना स्वेच्छेने कंपनी सोडण्याची संधी दिल्याचे वृत्त समोर आले आहे. आर्थिक लाभ देऊन कर्मचाऱ्यांना बाहेर पडण्याचा पर्याय देणाऱ्या या निर्णयाने जागतिक कॉर्पोरेट क्षेत्रात चर्चेला सुरुवात झाली आहे. या निर्णयामागे कृत्रिम बुद्धिमत्ता (अख), वाढता तंत्रज्ञानाचा वापर, खर्चावर नियंत्रण आणि व्यावसायिक पुनर्रचना अशी विविध कारणे असल्याचे मानले जात आहे. प्रत्यक्षात किती कर्मचारी ही ऑफर स्वीकारतील, हे अद्याप स्पष्ट नाही. मात्र, या घटनेतून एक महत्त्वाचा संदेश समोर येतो, तो म्हणजे मोठी कंपनी म्हणजे कायमस्वरूपी नोकरीची हमी नाही आणि वर्षानुवर्षांचा अनुभव म्हणजे भविष्यातील यशाची खात्रीही नाही! मायक्रोसॉफ्टसारख्या जागतिक कंपनीला मनुष्यबळाच्या पुनर्रचनेचा विचार करावा लागत असेल, तर महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्थांनीही या बदलत्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

**'एआय'मुळे बदलणार कामाचे स्वरूप!**

आज कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे माहिती संकलन, विश्लेषण, अहवाल तयार करणे, ग्राहकांच्या प्रश्नांना उत्तरे देणे, प्रशासकीय कामे आणि सॉफ्टवेअर निर्मिती अशा अनेक कामांचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी दहा कर्मचाऱ्यांच्या मदतीने होणारे काही काम आता तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कमी वेळेत आणि कमी मनुष्यबळात पूर्ण होऊ शकते. याचा अर्थ सर्व नोकऱ्या संपतील असा नाही; मात्र तंत्रज्ञानाशी जुळवून न घेणाऱ्या कर्मचाऱ्यांसमोर आव्हाने निर्माण होणार आहेत. पतसंस्थांनाही याची जाणीव ठेवावी लागेल. संगणकीकृत व्यवहार, सीबीएस प्रणाली, डिजिटल सेवा, ऑनलाइन ग्राहक संपर्क, सायबर सुरक्षा आणि स्वयंचलित लेखांकन यांचा वापर वाढत असताना केवळ पारंपरिक कामकाजावर अवलंबून राहणे भविष्यात अडचणीचे ठरू शकते.

**पतसंस्थांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ!**

पतसंस्थेच्या यशाचे मोजमाप केवळ शाखांची संख्या, ठेवींचा आकडा किंवा कर्मचारीसंख्या यावर होऊ नये. प्रत्येक शाखेची आर्थिक कामगिरी, प्रति कर्मचारी उत्पादकता, कर्जवसुली, थकबाकी, ग्राहक समाधान आणि प्रशासकीय खर्च यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास झाला पाहिजे. कमी कर्मचारी ठेवणे म्हणजे कार्यक्षमता नव्हे, तर उपलब्ध मनुष्यबळाकडून अधिक गुणवत्तापूर्ण काम करून घेणे म्हणजे खरी कार्यक्षमता होय. यासाठी संचालक मंडळाने आणि व्यवस्थापनाने दहा बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. प्रथम, प्रत्येक शाखेचे उत्पन्न आणि खर्च तपासून अनुत्पादक खर्चाला आळा घालावा. दुसरे, कर्मचाऱ्यांना डिजिटल बँकिंग, उइड, सायबर सुरक्षा, कर्ज विश्लेषण आणि अख साधनांचे प्रशिक्षण द्यावे. तिसरे, तंत्रज्ञानाला विरोध न करता त्याचा जबाबदारीने स्वीकार करावा. चौथे, कर्मचारी हा खर्च नसून संस्थेची संपत्ती आहे, ही भूमिका ठेवावी. पाचवे, नातेसंबंध, शिफारस किंवा संचालकांशी जवळीक याऐवजी कामगिरीला महत्त्व देणारी पारदर्शक मूल्यमापन पद्धती असावी. सहावे, एखाद्या एकाच कर्मचाऱ्यावर महत्त्वाच्या कामाची जबाबदारी अवलंबून राहणार नाही, यासाठी पर्यायी कर्मचारी आणि प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार कराव्यात. सातवे, कर्मचारी कपातीचा विचार करण्यापूर्वी व्यवस्थापनाने स्वतः च्या निर्णयांचे आत्मपरीक्षण करावे. चुकीची गुंतवणूक, वाढती थकबाकी, अनावश्यक प्रशासकीय खर्च आणि नियोजनातील त्रुटी यांची जबाबदारी कर्मचाऱ्यांवर ढकलणे योग्य नाही. आठवे, ग्राहकांचा विश्वास टिकवणे ही प्रत्येक कर्मचाऱ्याची जबाबदारी असली पाहिजे. नववे, वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करून त्याचा प्रत्यक्ष कामकाजावर झालेला परिणाम तपासावा. दहावे, संस्थेत बदल घडवताना कर्मचाऱ्यांना विश्वासात घ्यावे. कर्मचारी कपात हा पहिला पर्याय न ठेवता प्रशिक्षण, कामाचे पुनर्वाटप, नैसर्गिक कर्मचारी निर्गमन आणि पर्यायी जबाबदाऱ्यांचा विचार करावा.

**कर्मचाऱ्यांनीही स्वतःला प्रश्न विचारावेत!**

पतसंस्थेतील प्रत्येक कर्मचाऱ्यानेही बदलत्या काळाचे भान ठेवले पाहिजे. गेल्या वर्षभरात आपण कोणते नवीन कौशल्य आत्मसात केले? आपल्या कामामुळे संस्थेचा खर्च कमी झाला की वाढला? ग्राहकांचा विश्वास वाढवण्यासाठी आपण काय केले? आपल्या अनुपस्थितीत आपले काम दुसरा कर्मचारी करू शकतो का? उद्या जबाबदारी बदलली तर नवीन काम स्वीकारण्याची आपली तयारी आहे का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे स्वतःला देता आली पाहिजेत. केवळ सेवाज्येष्ठता, अनुभव किंवा पद यावर भविष्यातील महत्त्व अवलंबून राहणार नाही. ज्ञान अद्ययावत ठेवणारा, तंत्रज्ञान आत्मसात करणारा, ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण करणारा आणि संस्थेच्या आर्थिक शिस्तीत योगदान देणारा कर्मचारीच बदलत्या व्यवस्थेत आपले स्थान अधिक सक्षमपणे टिकवू शकेल.

**व्यवस्थापनानेही जबाबदारी ओळखावी!**

बदलाच्या नावाखाली कर्मचारी कपात करणे हा कार्यक्षमतेचा एकमेव मार्ग नाही. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण न देता त्यांच्याकडून आधुनिक कामकाजाची अपेक्षा करणे, अपुरी साधने देऊन उत्पादकतेचा आग्रह धरणे किंवा व्यवस्थापनाच्या चुका कर्मचाऱ्यांच्या माथी मारणे अन्यायकारक ठरेल. कामगिरीचे निकष स्पष्ट, मूल्यमापन पारदर्शक आणि निर्णय न्याय्य असले पाहिजेत. संस्थेची प्रगती आणि कर्मचाऱ्यांचे हित यांचा समतोल साधणे हे संचालक मंडळाचे खरे नेतृत्व आहे.

**बदल स्वीकारा, अन्यथा काळ मागे टाकेल!**

मायक्रोसॉफ्टच्या निर्णयातून पतसंस्थांनी भीती घेण्यापेक्षा भविष्याचा वेध घ्यावा. तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ, आर्थिक शिस्त, पारदर्शक व्यवस्थापन आणि ग्राहकांचा विश्वास या पाच आधारस्तंभांवरच भविष्यातील पतसंस्थांची वाटचाल अवलंबून असेल. दलाचा अर्थ कर्मचारी कमी करणे नव्हे, तर प्रत्येक कर्मचाऱ्याची क्षमता वाढवणे हा आहे. संस्था मोठी असण्यापेक्षा सक्षम असणे महत्त्वाचे; कर्मचारी जास्त असण्यापेक्षा कुशल असणे महत्त्वाचे आणि नफा मिळवण्यापेक्षा तो विश्वास व आर्थिक शिस्तीच्या आधारावर मिळवणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण भविष्यात स्पर्धा केवळ पतसंस्थांमध्ये नसेल, तर पारंपरिक कामकाज आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्यातही असेल. संस्थांनी बदल स्वीकारला पाहिजे, कर्मचाऱ्यांनी कौशल्ये वाढवली पाहिजेत आणि व्यवस्थापनाने न्याय्य निर्णय घेतले पाहिजेत. अन्यथा कालचे यश उद्याच्या अस्तित्वाची हमी देऊ शकणार नाही!

## 'एसआयआर'ला १३ नोव्हेंबरपर्यंत पुन्हा मुदतवाढ आता अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबरला

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** राज्यात सुरु असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला भारत निवडणूक आयोगाने चौथ्यांदा मुदतवाढ दिली आहे. राज्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी (एसआयआर) मोहिमेंतर्गत नवमतदारांसह प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना आपले नाव मतदार यादीत नोंदविण्यासाठी यापूर्वी २६ ऑक्टोबर पर्यंत मुदत होती. ती आता वाढविण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार गेल्या दोन महिन्यांपासून राज्यात मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी मोहिम राबविली जात आहे. ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत यापूर्वीच्या मतदार यादीतील २ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. या मतदारांना पुन्हा मतदार यादीत नावे नोंदविण्यासाठी तीन वेळा संधी देण्यात आली असून त्याची मुदत २६ऑक्टोबर ला संपली होती. या मुदतीत १२ लाख १४ हजार ७१३ मतदारांनी नमुना-६ मध्ये अर्ज दाखल केले आहेत. मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्तीसाठी ६ लाख २ हजार १९९ मतदारांनी अर्ज नमुना-८ मध्ये, तर नावे वगळण्यासाठी ६२ हजार ६७२ अर्ज नमुना-७ मध्ये अर्ज दाखल केले आहेत. आयोगाकडे एकूण१८लाख ७९हजार५८४ हरकती,सूचना आणि नव्याने मतदार नोंदणी अर्ज दाखल झाले आहेत. मात्र राज्यातील अजूनही लाखो मतदार मतदार यादीत नाव नोंदण्यापासून वचिंत राहण्याची शक्यता होती. त्याची दखल घेत मतदार यादीतील नावांबाबतचे दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. तसेच दावे आणि हरकतींच्या नोटीस टप्प्यातील कार्यवाही व त्यांचा निपटारा करण्यासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली असून, अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी १३ नोव्हेंबर २०२६ असा असेल. नोटीस टप्पा आणि दावे-हरकतींचा निपटारा ३१ ऑगस्ट ते २५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर ३० नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. महाराष्ट्रासह १९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. मतदारांना आपले नाव, तपशील तसेच मतदार यादीतील नोंदी तपासून आवश्यक दावे व हरकती दाखल करण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

## पालिका शाळा व शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविणार : कदम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** पुणे विभागातील नगर पुणे सोलापूर या जिल्ह्यातील नगरपालिका व महानगरपालिका शाळा व शिक्षक यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी न पा मनपा शिक्षक संघ व पेन्शनर संघटनेच्या वतीने पुणे विभागाचे नूतन शिक्षण उपसंचालक मच्छिंद्रनाथ कदम यांच्याकडे करण्यात आली.

पुणे विभागाचा पदभार श्री कदम यांनी नुकताच स्वीकारला .न पा मनपा शिक्षक संघ व पेन्शनर शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळाने गुरुवारी त्यांची भेट घेऊन विभागातील प्रलंबित प्रश्नावर चर्चा केली.

पुणे विभागातील सर्व शिक्षण मंडळांना स्वतंत्र प्रशासन अधिकारी देऊन शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडे असलेल्या चार्ज काढण्यात यावा,शिक्षकांचे वेतन व पेन्शन दरमहा एक तारखेला होण्यासाठी पगार बिले दरमहा दहा तारखेच्या आत मागवावी,निवड वरिष्ठ श्रेणीचे प्रस्ताव मार्गे लावावेत,शिक्षण मंडळांना शंभर टक्के वेतन अनुदान मिळण्याकामी शासनाकडे पाठपुरावा करावा इत्यादी मागण्या बाबत शिक्षण उपसंचालक यांच्याशी शिष्टमंडळाने चर्चा केली.श्री कदम यांनी सर्व प्रश्नांची नोंद घेतली तसेच याबाबत आपण लवकरच योग्य तो निर्णय घेऊ असे आश्वासन दिले.

यावेळी न पा मनपा शिक्षक संघ व सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने शिक्षक बँकेचे माजी चेअरमन सलीमखान पठाण, तसेच न पा मनापा शिक्षक संघ पुणे विभागाचे अध्यक्ष, कोरे,अल्ताफ शहा,रमेश कोटगी, सौ.सिध्दव्वा शिवशरण, श्रीशैल शिवशरण,किशोर त्रिभुवन,इमरान अत्तार आदिंनी सत्कार केला.

## संकष्टी चतुर्थीनिमित्त पावन गणपती मंदिरात भाविकांची मांदियाळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** संकष्टी चतुर्थीच्या पावन पर्वानिमित्त नेवासा ते नेवासाफाटा रस्त्यावर असलेल्या पुरातन पावन गणपती मंदिरात हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. पहाटेपासूनच गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची रीघ लागली होती. सायंकाळी आयोजित महाआरतीला महिला व पुरुष भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संपूर्ण मंदिर परिसर गणपती बाप्पाच्या जयघोषाने भक्तिमय झाला होता. संकष्टी चतुर्थीनिमित्त पहाटेपासूनच भाविकांनी पावन गणपतीच्या दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. देवस्थानच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचे अध्यक्ष सुखदेव वाखुरे, विश्वस्त मंडळाचे सदस्य तसेच मंदिराचे पुजारी दत्तात्रय गायकवाड यांनी स्वागत केले.प्रवचन सेवेतून आध्यात्मिक प्रबोधन सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत पूज्य धर्मभूषण पोपट महाराज कुसमुडे (वांबोरीकर) यांची प्रवचन सेवा झाली. त्यांच्या प्रवचनातून उपस्थित भाविकांना आध्यात्मिक विचारांचे श्रवण करण्याची संधी मिळाली. प्रवचनानंतर रात्री पार पडलेल्या महाआरतीच्या वेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. महाप्रसादाचे भाविकांना वाटप महाआरतीनंतर पावन गणपती मंदिर परिसरात राहणारे गणेशभक्त ज्ञानेश्वर माऊली लष्करे यांच्या वतीने उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## संजीवनी अकॅडमीत 'झेप, प्रगती आणि सिंहगर्जना' संकल्पनेतून संस्कृतिक दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव:** संजीवनी अकॅडमीच्या प्राथमिक विभागाचा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव 'झेप, प्रगती आणि सिंहगर्जना' या संकल्पनेवर आधारित उत्साहपूर्ण वातावरणात नुकताच संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, शिस्त, सांघिक वृत्ती, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवात विध्यार्थ्यानी विविध क्रीडाप्रकारांसह सादर केलेल्या आकर्षक झांक्यांनी सामूहिक कवायतींनी उपस्थितांची मने जिंकली.

या महोत्सवाला संजीवनी विद्यापीठाचे प्रेसिडेंट अमित कोल्हे, संजीवनीच्या संचालिका डॉ. मनालीताई कोल्हे, नाशिक येथील प्रसिद्ध उद्योजक, काळाराम मंदिराचे विश्वस्त व संजीवनी पॉलिटेक्निकचे माजी विद्यार्थी मिलिंद तारे, संजीवनी विद्यापीठाचे व्हाईस चांसलर डॉ. ए. जी. ठाकूर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य ए. आर. मिरिकर, संजीवनी अकॅडमीच्या प्राचार्या सुधा सुब्रमण्यम, संजीवनी अकॅडमीची माजी विद्यार्थिनी अनुष्का सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राथमिक विभागातील इयत्ता पहिली ते चैथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि कलागुणांतून विविध विषयांवर आधारित झांक्यांचे सादरीकरण केले. यामध्ये प्राचीन भारतीय खेळ, आदिवासी जीवनशैली व परंपरा, भारतातील पवित्र नद्या, पर्वतरांगा, सांस्कृतिक वारसा, विविध देशांच्या संस्कृती तसेच जागतिक वैविध्य अशा अनेक विषयांचा समावेश होता. वेशभूषा, आकर्षक सजावट, विषयाला अनुरूप मांडणी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे प्रत्येक सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी मिलिंद तारे यांनी विद्याथ्र्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे, त्यांच्या शिस्तीचे तसेच शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांमधील कल्पकता, उत्साह आणि सांघिक भावना पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. माजी विद्यार्थिनी अनुष्का सोनवणे हिने आपल्या शालेय आठवणींना उजाळा देताना शाळेतील शिक्षकांचा आपल्या जीवनाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असल्याचे आवर्जून नमूद केले.

## कृषी प्रक्रिया उद्योजक शास्त्रज्ञ मंचच्या अध्यक्षपदी प्रा. सतीश राऊत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि कृषी विभाग, आत्मा, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृषी प्रक्रिया उद्योगक शास्त्रज्ञ मंच'ची नुकतीच स्थापना करण्यात आली असून अध्यक्षपदी पिंपळगाव फुणगी येथील प्रयोगशील शेतकरी प्रा. सतिश राऊत यांची निवड कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी जाहीर केली आहे. राहुरी येथे डॉ. अण्णासाहेब शिंदे शासकीय कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते.

कृषी प्रक्रिया उद्योगक शास्त्रज्ञ मंचच्या उप अध्यक्षपदी श्रीरामपूर येथील नानासाहेब तांबे, सचिवपदी अकोले तालुक्यातील सुगावचे आशिष देशमुख तर सह सचिव म्हणून लोणी येथील यश शिंदे यांची निवड झाली आहे.

प्रा. सतिश राऊत यांच्या नेतृत्वातून शेतकरी, उद्योजक आणि शास्त्रज्ञ यांच्यातील समन्वय अधिक दृढ होऊन कृषी प्रक्रिया उद्योग, ग्रामीण उद्योजकता तसेच शाश्वत शेती विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

'नवे नेतृत्व, नवी ऊर्जा, नवे संकल्प' या भावनेतून कृषी क्षेत्रातील विविध घटकांना एकत्र आणून शेतकरी समृद्धी, कृषी मूल्यवर्धन आणि ग्रामीण उद्योगांच्या विकासासाठी एकत्रितपणे वाटचाल करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

अन्नप्रक्रिया विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड पुढाकारातून संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. विक्रम कड, प्रदीप लाटे, डॉ. पंडित खर्डे, सतीश राऊत, मंजुळा देशमुख उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पैस खांब मंदिराचे उद्धारक व महान विभूती

### गुरुवर्य बन्सी महाराज तांबे

संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी तीर्थक्षेत्र नेवासे नगरीत निर्माण झालेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या रचनास्थानाची ओळख जगाला कळावी म्हणून गुरुवर्य ब्रम्हलिन श्री बन्सी महाराज तांबे यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरून या स्थानाचा व वारकरी संप्रदायाचा प्रचार प्रसार केला. वारकरी संप्रदायाची पताका उंचावर नेणारे महान विभूती ब्रम्हलिन गुरुवर्य बन्सी महाराज तांबे महाराज यांचा वद्य पंचमीला ३२ वा पुण्यतिथी सोहळा साजरा होत असून माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या पैस खांबासाठी बांधलेले मंदिर हे जगापुढे आदर्शवत ठरत आहे. गुरुवर्य श्री बन्सी बाबांच्या ३२ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून देणारा हा शब्द प्रपंच.. वारकरी संप्रदायाचे जे ''वैभवशाली पर्व''निर्माण झाले, त्याची पायाभरणी ज्या महात्म्यांनी केली त्या मध्ये गुरुवर्य बन्सीबाबांचं''नाव अग्रणी घेतले जाते.स्वतः च्या मालकीची संपूर्ण वडिलोपार्जित इस्टेट विकून स्वतःचे आर्थिक, शारीरिक व मानसिक योगदान देत त्यांनी श्री क्षेत्र नेवासा येथील माऊलींच्या या ज्ञानेश्वरी रचना स्थानाचा प्रचार व प्रसार महाराष्ट्रभर प्रवचन किर्तनाच्या माध्यमातून फिरून केला.

जगात खांबावर मंदिरे उभारली गेली मात्र नेवासे येथील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या स्पर्शाने जो पैस खांब परीस समान झाला अशा पैस खांबासाठी बांधलेले मंदिर हे जगातील एक आश्चर्यच म्हणावे लागेल.''ज्ञानेश्वरी रचनास्थानाचा जीर्णोद्धार करणाऱ्या गुरुवर्य बन्सी महाराज तांबे बाबांनी त्यावेळी नेवासे,श्रीरामपूर,राहुरीसह नगर जिल्ह्यातील गावोगावी जावून''ज्ञानेश्वरी व गाथा''पारायणाची सुरुवात केली. आज त्यांनी केलेल्या तपश्चर्येमुळे संपूर्ण जगभरात ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायणे वैभवात पार पडत आहे. गुरुवर्य ब्रम्हलिन बन्सी बाबांनी या स्थानाचा प्रचार व प्रसार करतांना बसचे भाडे सोडून,कीर्तन व प्रवचन सेवेचा रूपया ही घेतला नव्हता.त्यांच्या ठाई माऊलींची प्रज्ञा व तुकोबारायांचं वैराग्य होतं. निरपेक्ष,निस्वार्थ, अध्यात्मिक भावनेने त्यांनी कथा कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानदानाचे पवित्र कार्य समाजाच्या उद्धारासाठी केले.

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात फिरून माऊलींच्या या भूमीचा महिमा जगासमोर सांगत असतांना त्यांनी समाजासाठी प्रबोधन करणारे हजारो कीर्तनकार ही घडवले.आज बन्सी महाराजांचे लाखो भक्त महाराष्ट्रभर आहे.हे विश्व ची माझे घर असा संदेश संत ज्ञानेश्वर माऊलींनी याच नेवासेच्या पवित्र भूमीतून जगाला दिला.आज इंटरनेटच्या माध्यमातून जग जवळ आले असल्याने माऊलींचा तो संदेश खरा ठरत आहे. एकेकाळी माऊलींच्या या रचनास्थानाची अवस्था दयनीय अशी होती माऊलींच्या सोनेरी स्पर्शाने परीस झालेला ''पैस''खांब ही दुर्लक्षित होता.या स्थानाचे महत्व जगाला कळण्यासाठी गुरुवर्य बन्सी बाबांनी तहान भूक विसरून प्रचार प्रसार केला..त्यांनी केलेल्या या कार्यामुळे आज माऊलींचा महिमा जगभर जाऊन पोहचला आहे.

गुरुवर्य बन्सी बाबांनी घालवून दिलेल्या शिस्तीचे पालन वारकरी संप्रदायाच्या नियमांप्रमाणे आज संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर संस्थानचे प्रमुख वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंगजी अभंग व सर्व विश्वस्त मंडळी करत आहे. गोकुळाष्टमी व श्रावण महिन्यातील अखंड हरिनाम सप्ताह यासह वर्षभर बन्सी बाबांनी घालवून दिलेल्या नियमांचे पालन करून परंपरेनुसार धार्मिक कार्यक्रम आजही उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडले जातात ''वारकरी संप्रदायाच्या''मूल्यांची जोपासना करण्यासाठी माऊलींच्या कर्मभूमीत जन्माला आलेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरीचा प्रचार प्रसार करून संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिर निर्मितीसाठी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे यांनी चंदनापरी देह झिजवून सर्वस्व पणाला लावले. मानव हीच जात आणि मानवता हाच धर्म ही त्यांच्या विचारांची जोपासना आजही येथे केली जात आहे. गुरुवर्य ब्रम्हलिन श्री बन्सी महाराज तांबे हे स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेणारे स्वातंत्र्य सैनिक ही होते.त्यांच्या ३२ व्या पुण्यतिथी निमित्ताने गुरुवर्य ब्रम्हलिन श्री बन्सी महाराज तांबे बाबांच्या चरणी'' त्रिवार वंदन.. ....रामकृष्ण हरी..

**संकलन- पत्रकार सुधीर चव्हाण...**
प्रसिद्धी प्रमुख अखिल भारतीय वारकरी मंडळ
नेवासा तालुका
**भैय्या कावरे पाटील**
जनसंपर्क अधिकारी संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर
देवस्थान नेवासा

## १८ वर्षांच्या सहवासाला भावपूर्ण निरोप घोड्याचा विधिवत दशक्रियाविधी

**आश्वी :**माणसाच्या मृत्यूनंतर धार्मिक विधी पार पाडण्याची परंपरा सर्वश्रुत आहे. मात्र, मुक्या प्राण्यालाही कुटुंबातील सदस्य मानून त्याच्या निधनानंतर विधिवत दशक्रियाविधी करण्याची अनोखी घटना शेडगाव (ता. संगमनेर) येथे घडली. येथील सांगळे परिवाराने १८ वर्षे जिवापाड जपलेल्या 'युवराज' नामक घोड्याच्या निधनानंतर दहाव्या दिवशी पिंडदान, तिळांजली, काकस्पर्श आणि प्रवचनासह धार्मिक विधी पार पाडले. या अनोख्या कृतज्ञता सोहळ्याची परिसरात चर्चा सुरू आहे. शेडगाव येथील प्रगतशील शेतकरी, आश्विनी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन तथा

निवृत्त मेजर संपतराव सांगळे आणि संगमनेर पंचायत समितीचे माजी सदस्य निवृत्ती सांगळे यांच्या परिवारात युवराज गेल्या १८ वर्षांपासून राहत होता. मेजर सांगळे त्याचा आहार, व्यायाम, अंघोळ आणि आरोग्याची नियमित काळजी घेत होते. त्यामुळे युवराज हा केवळ पाळीव प्राणी न राहता कुटुंबाचा अविभाज्य सदस्य बनला होता. वयाच्या १८व्या वर्षी अल्पशा आजाराने त्याचे निधन झाल्याने परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला.युवराजच्या निधनानंतर सांगळे परिवाराने त्याचा अंत्यविधी केला. दहाव्या दिवशी सांगळे वस्तीवर वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांच्या मंत्रोच्चारात दशक्रियाविधी पार पडला. पिंडदान, तिळांजली आणि काकस्पर्श करण्यात आला. तसेच युवराजच्या समाधीस्थळी आंब्याचे रोपटे लावून त्याच्या स्मृती जपण्याचा संकल्प करण्यात आला. विधीनंतर उपस्थितांना अन्नदान करण्यात आले.यावेळी ह.भ.प. पारखे महाराज (करणपूरकर) यांनी प्रवचनातून घोड्याचे महत्त्व आणि मानवाशी असलेले त्याचे नाते विशद केले. या भावपूर्ण कार्यक्रमाला ह.भ.प. शितलताई साबळे, ह.भ.प. प्रकाश आव्हाड, ह.भ.प. सुनील पवार, भगवानराव इलग, राजेंद्र चकोर, विक्रम थोरात, दिलीप नागरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्रामस्थ आणि नातेवाईक उपस्थित होते.

## ऑनलाईन पेमेंट स्वीकारण्यास व्यापाऱ्यांची टाळाटाळ; ग्राहकांची गैरसोय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा :** दिवाळीचा सण जवळ येत असताना बाजारपेठेत खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी वाढत आहे. मात्र, अनेक व्यापारी ग्राहकांकडून ऑनलाईन पेमेंट स्वीकारण्यास टाळाटाळ करीत असल्याने ग्राहक त्रस्त झाले आहेत. काही व्यापारी आणि डॉक्टरांकडून केवळ रोख रकमेचा आग्रह धरला जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

पुणतांबा परिसरातील बहुतांश ग्रामस्थांचा दैनंदिन व्यवहार श्रीरामपूर शहराशी असल्याने तेथील बाजारपेठेत खरेदी केली जाते. विशेषतः एक हजार रुपयांपेक्षा अधिक खरेदी केल्यास काही व्यापारी ऑनलाईन पैसे स्वीकारण्यास तयार होत नसल्याचा अनुभव ग्राहकांना येत आहे.

नुकतेच एका शेतकऱ्याने श्रीरामपूरच्या मुख्य बाजारपेठेतील नामांकित दुकानातून विद्युत मोटारीसाठी २६ मीटर केबल खरेदी केली. सुमारे चार हजार रुपयांचे ऑनलाईन पेमेंट करताना दुकानदाराने रोख रक्कम देण्यास सांगितले. रोख पैसे दिल्यास प्रतिमीटर पाच रुपये कमी, तर ऑनलाईन पेमेंट केल्यास पाच रुपये जादा आकारले जातील, असे सांगण्यात आले. ऑनलाईन व्यवहार नोंदीवर येऊन कर भरावा लागत असल्याचे कारणही दुकानदाराने दिल्याची तक्रार आहे.

डिजिटल व्यवहारांना शासनाकडून प्रोत्साहन दिले जात असताना काही व्यापाऱ्यांकडून अशा प्रकारे ग्राहकांची अडवणूक होत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकारांची ग्राहक मंचाकडे तक्रार करण्याचा विचार काही सजग ग्राहक करीत असल्याचे समजते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### राष्ट्रीय आदर्श शिक्षिका सन्मानाने निर्मला लांडगे गौरवान्वित

**श्रीरामपूर :** हिंद सेवा मंडळाच्या भि. रा. खटोड कन्या विद्यालयाच्या उपक्रमशील शिक्षिका निर्मला अशोक लांडगे यांना 'राष्ट्रीय आदर्श शिक्षिका सन्मान २०२६' ने गौरविण्यात आले. बी द चेंज फाउंडेशन, नाशिक तर्फे शिर्डी येथे झालेल्या सोहळ्यात सहाय्यक धर्मादाय आयुक्त विशाल शेंडे, कबड्डी प्रशिक्षक अरुण भंडारे व उद्योजिका निवेदिता पगार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. १४ वर्षांच्या सेवेत लांडगे यांनी १००% उपस्थिती, पटवाढ, मूल्यशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, गरजूंना गणवेश वाटप आणि शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. शाळेबाहेरही त्या रेडक्रॉसच्या माध्यमातून आरोग्य शिबिरे, रक्तदान, पूरग्रस्तांना मदत असे सामाजिक कार्य करतात. या बहुमानामागे पती सचिन चंदन, सासरे रमेश चंदन व कुटुंबीय यांची साथ असल्याचे त्यांनी सांगितले.

### संदीप गडाख यांना मुंबई विद्यापीठाकडून पीएच.डी. प्रदान

**श्रीरामपूर :** शहरातील मोरगे वस्ती येथे स्थायिक असलेले संशोधक संदीप वसंतराव गडाख यांना मुंबई विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या रसायनशास्त्र विषयात विशेष प्राविण्य मिळवून मुंबई विद्यापीठाकडून रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. संदीप गडाख यांनी डिझाईन अँड सिंथेसिस ऑफ बायोक्टिव्ह हेटरोसायक्लिक कंपाऊंड्स अँड देअर इम्पॉर्टन्स इन मेडिसिनल केमिस्ट्री. या विषयावर आपला प्रबंध विद्यापीठात सादर केला. त्यात त्यांनी कठोर परिश्रम घेत यश मिळवले असून त्यांना पनवेल येथील चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. बाळासाहेब आघाव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील आणि रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. बी. व्ही. जाधव यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले

### वाचन संस्कृती रुजविण्यासाठी शब्दगंधचा पुढाकार; पुस्तक भेट देण्याचे आवाहन

**नेवासा :** ग्रामीण भागात वाचन संस्कृतीचा प्रसार व्हावा, विद्यार्थी आणि नव्या पिढीला पुस्तकांची गोडी लागावी, या उद्देशाने शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य, नेवासा तालुका शाखेच्या वतीने गावोगावी 'फिरते मोफत वाचनालय' आणि 'शब्दगंध सामूहिक वाचन उपक्रम' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी नागरिकांनी आपल्या संग्रही असलेली पुस्तके व ग्रंथ भेट द्यावेत, असे आवाहन तालुकाध्यक्ष प्रा. डॉ. किशोर धनवटे व मार्गदर्शक प्राचार्य डॉ. अशोकराव ढगे यांनी केले आहे. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारांना दिशा मिळते आणि समाज अधिक प्रगल्भ होतो. हा विचार घेऊन ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी परिषद प्रयत्नशील आहे. या उपक्रमासाठी कथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह, चरित्रे, आत्मचरित्रे, वैचारिक साहित्य, बालसाहित्य, धार्मिक व संदर्भग्रंथांची आवश्यकता आहे. शब्दगंधची तालुका टीम स्वखर्चाने हा उपक्रम राबवत आहे. या सामाजिक कार्याला साहित्यप्रेमी, शिक्षक, नागरिक आणि दानशूर व्यक्तींनी पुस्तक भेट देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### युवा उद्योजक बाळासाहेब मारकळी यांना आदर्श कार्यगौरव पुरस्कार

**नेवासा :** युवा पिढीला सतत प्रेरणा पाठबळ देत सामाजिक कार्यात योगदान देत जनतेच्या प्रश्नांसाठी लोकहित डोळ्यासमोर ठेऊन केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल नेवासा बुद्रुक येथील युवा उद्योजक बाळासाहेब उर्फ नितीन मारकळी यांना पाथर्डी तालुक्यातील दैत्य नांदूर येथील जय भगवान युवा प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय आदर्श कार्यगौरव पुरस्कार झालेल्या पुरस्कार वितरण समारंभ कार्यक्रमात बुधवारी सायंकाळी प्रदान करण्यात आला. रिलस्टार सिद्धेश लोकरे व महंत केशव महाराज शास्त्री यांच्या हस्ते व उद्योजक बबन सांगळे, पांडुरंग आंधळे, दीपक नागरगोजे, अशोक देशमाने, महेश डाळिंबकर, श्रीहरी तांबडे, आदिनाथ दहिफळे, संजूबाबा गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत नितीन शरदराव मारकळी यांना प्रदान करण्यात आला.

# प्रवरा नदीपात्रातील ४७ ब्रास वाळूसाठा जप्त!

## १४ घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा : प्रवरा नदीपात्रात अनधिकृतपणे साठवून ठेवलेल्या वाळूविरुद्ध महसूल प्रशासनाने धडक कारवाई करत अंदाजे ४७ ब्रास वाळूसाठा ताब्यात घेतला. विशेष म्हणजे, जप्त केलेली वाळू वाया न घालवता नेवासा खुर्द कार्यक्षेत्रातील १४ घरकुल लाभार्थ्यांना मोफत वितरित करण्यात आली. महसूल प्रशासनाच्या या कार्यवाहीमुळे अनधिकृत वाळूसाठ्यांवर कारवाई करण्यासोबतच गरजू घरकुल लाभार्थ्यांनाही मदत मिळाली आहे.**

अहिल्यानगर नेवासा प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नेवासा तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या उपस्थितीत दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रवरा नदीपात्रात अचानक पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान नदीपात्रातील वेगवेगळ्या तीन ठिकाणी लहान-मोठे वाळूसाठे आढळून आले. या साठ्यांमध्ये अंदाजे ४७ ब्रास वाळू असल्याचे निदर्शनास आले.

सदर वाळूसाठ्याचा तहसीलदार यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आला. त्यानंतर हा वाळूसाठा महसूल प्रशासनाने ताब्यात घेतला. तहसीलदार यांच्या सूचनेनुसार जप्त केलेली वाळू नेवासा खुर्द कार्यक्षेत्रातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे आणि घरकुल अभियंता राहुल आढाव यांच्या ताब्यात रीतसर ताबे पावती करून वाळू सुपूर्द करण्यात आली. नगरपंचायतीच्या माध्यमातून ही वाळू १४ घरकुल लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली.

**अवैध वाळू वाहतुकीचा मार्ग बंद**

दरम्यान, नदीपात्रात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरून अनधिकृत वाळू वाहतूक होऊ नये, यासाठी जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावर खड्डे घेऊन वाहतुकीचा मार्ग बंद करण्यात आला. या प्रतिबंधात्मक उपाययोजनेमुळे नदीपात्रातून होणाऱ्या संभाव्य अनधिकृत वाळू वाहतुकीला आळा घालण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

ही संपूर्ण मोहीम मंडळ अधिकारी अनिल गव्हाणे, ग्राम महसूल अधिकारी धनंजय परदेशी, पल्लवी पवार, नवनाथ लष्करे, ओंकार मापारी, राहुल चव्हाण, कृष्णा टेकावडे यांच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आली. महसूल प्रशासनाच्या या कारवाईमुळे अनधिकृत वाळूसाठ्यांवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच जप्त वाळूचा उपयोग गरजू घरकुल लाभार्थ्यांसाठी करण्यात आला. त्यामुळे प्रशासकीय कारवाईसोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रमही या माध्यमातून साध्य झाला.

## ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून काढली १५ किलो वजनाची अंडाशयाची गाठ!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून तब्बल १५ किलो वजनाची अंडाशयाची गाठ शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या काढली. शनिवार (दि. १७ ऑक्टोबर) रोजी झालेली ही आव्हानात्मक शस्त्रक्रिया सुमारे तीन तास चालली. शस्त्रक्रियेनंतर महिलेची प्रकृती उत्तम असून, तिच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत आहे.

संबंधित महिलेच्या पोटात मोठ्या आकाराची गाठ तयार झाली होती. त्यामुळे पोटावर प्रचंड ताण निर्माण होऊन तिला श्वास घेणे, लघवी करणे तसेच शौचास जाण्यास त्रास होत होता. गाठीचा आकार वाढल्याने तिच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम झाला होता. वैद्यकीय तपासणीत ही अंडाशयाची गाठ असल्याचे स्पष्ट झाले. गाठीचा मोठा आकार आणि ती आजूबाजूच्या इतर अवयवांना चिकटलेली असल्याने शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक होती. या शस्त्रक्रियेत कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. अद्वैत वैद्य आणि मूत्रविकार तज्ज्ञ डॉ. दीपक गाडेकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. रुग्णाचे वय, गाठीचा आकार आणि इतर अवयवांना झालेली चिकटण लक्षात घेऊन विशेष काळजी घेत नियोजनबद्ध पद्धतीने शस्त्रक्रिया करण्यात आली. डॉक्टरांच्या पथकाने अवघ्या तीन तासांत १५ किलो वजनाची गाठ यशस्वीरीत्या काढली.

दरम्यान, डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकारातून आधुनिक वैद्यकीय सुविधा सर्वसामान्य रुग्णांना उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या शस्त्रक्रियेच्या यशामुळे रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचे कौशल्य आणि प्रगत वैद्यकीय सुविधांची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. रुग्णालयाच्या उपचार पथकाने समाधान व्यक्त केले आहे.

## पंतप्रधानांच्या उपस्थितीत संजीवनी सैनिकी स्कूलचा 'राष्ट्रीय नाद' घुमणार !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आज, ३१ ऑक्टोबर रोजी गुजरातमधील एकतानगर येथे होणाऱ्या 'एकता परेड-२०२६' मध्ये संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे ब्रास बँड पथक आपल्या सुरेल व शिस्तबद्ध वादनाने राष्ट्रीय मंचावर महाराष्ट्राचा गौरव वाढविणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या दिमाखदार सोहळ्यात सादरीकरण करण्याचा बहुमान विध्यार्थ्यांना मिळाला असून, त्यांच्या वादनातून संजीवनीचा 'राष्ट्रीय नाद' घुमणार आहे.

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने ९ सप्टेंबर २०२६ रोजी पाठविलेल्या अधिकृत पत्रानुसार, संजीवनीच्या ब्रास बँड पथकाची 'स्कूल बँड डिस्प्ले'मधील 'बॉईज ब्रास बँड' श्रेणीसाठी निवड झाली.

त्यानुसार २१ ऑक्टोबरपासून एकतानगर येथे देशभरातील निवडक शालेय बँड पथकांसोबत संयुक्त सराव सुरू झाला. गेल्या दहा दिवसांपासून भारतीय लष्कराच्या पथकांसह सराव करताना संजीवनीच्या विद्याथ्र्यांनी वादनातील अचूकता, संचलनातील शिस्त, ताल-लय आणि सांघिक समन्वय यांचा उत्कृष्ट प्रत्यय दिला आहे.

दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर मिळालेली ही संधी विध्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि गुणवत्तेवर राष्ट्रीय स्तरावर उमटलेली मोहोर आहे.

प्रत्येक सूर, ठेका आणि संचलनातील पाऊल अचूक साधण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेतले. राष्ट्रीय स्तरावरील संयुक्त सरावातही त्यांनी आत्मविश्वास आणि शिस्तीचे दर्शन घडविले.

संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे आणि मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून आजच्या सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विश्वस्त श्री सुमित कोल्हे हे विध्यार्थ्यांसोबत एकतानगर येथे उपस्थित आहेत.

## जलजीवननंतर नेवासा तालुक्यात मनरेगा योजनेतही कोट्यवधींचा घोटाळा?

### अधिकारी-ठेकेदाराच्या मधुर संबंधातून शासनाची फसवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेचा महाघोटाळा गाजत असतानाच, आता नेवासा तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) कामातही कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचा खळबळजनक आरोप समोर आला आहे.

भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ कार्यकर्ते अशोकराव ताके पाटील यांनी याबाबत पुराव्यासह पेन ड्राईव्ह थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रोहयो मंत्री शिवराजसिंह चौहान, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, रोहयो मंत्री भरत गोगावले व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देणार असल्याचे सांगत सखोल चौकशीची मागणी केली आहे.

अशोकराव ताके पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, मनरेगा ही योजना नसून ग्रामीण भागाला शाश्वत रोजगार देणारा कायदा आहे. मात्र नेवासे सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नेवासा यांनी या कायद्याचीच पायमल्ली केली आहे या विभागाचे आयुक्त यांनी दि. १ जानेवारी २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकाला केराची टोपली दाखवत शासनाने निश्चित केलेले दरपत्रक डावलून ठेकेदाराला फायदा व्हावा यासाठी वेगळेच अंदाजपत्रक तयार करण्यात आले. तसेच कामांचे जिओ टॅगिंग करणे, प्रत्येक टप्प्यावर शासनाच्या पमधून फोटो काढणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात मातीच्या फुपाट्यावर केवळ दोन इंच काँक्रीट टाकून कामे उरकण्यात आली. यावेळी एकही संबंधित अधिकारी हजर नव्हता, ठेकेदारालाच मनमानी करण्याची मोकळीक देण्यात आली.

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बहिरवाडी येथील रस्ता, बेलपिंपळगाव येथील कारवाडी परिसरातील खंडोबा देवस्थान व दत्त मंदिर परिसरातील कामे, प्रवारासंगम येथे स्मशानभूमीत पेवर ब्लॉक बसविणे, घोगरगाव (फडे वस्ती ते किरण पटारे वस्ती) रस्ता काँक्रीटीकरण, बेलपिंपळगाव लव्हई वस्ती रस्ता, जैनपूर (नांगरे वस्ती ते ताराचंद वस्ती, पंडुरे वस्ती, कचरू वाघ ते विलास सुरवसे वस्ती) रस्ते. या सर्व कामात लाखो रुपयांची बिले ठेकेदाराला अदा करून शासनाची फसवणूक झाल्याचे स्पष्ट होत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, या कार्यालयाशी कोणताही संबंध नसलेले पातकळ नावाचे सेवानिवृत्त कर्मचारी निवृत्तीनंतरही रोज कार्यालयात ठाण मांडून बसतात.

## भूमिपूजन मोठ्या थाटात, मात्र दोन वर्षांपासून रस्ता रखडला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** कोकमठाण येथील देवयानी डेअरी-कांचनवाडी ते कोकमठाण (ई. जि.मा. ५) या महत्त्वाच्या रस्त्याचे काम मागील दोन वर्षांपासून रखडले असून, नागरिकांना दररोज गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते या रस्त्याच्या कामाचे मोठ्या थाटामाटात भूमिपूजन करण्यात आले होते. मात्र, भूमिपूजनानंतरही रस्त्याचे काम पूर्णत्वास गेले नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी ज्येष्ठ नेते शरदराव थोरात यांनी केली आहे.

कोकमठाण, संवत्सर, सडे आणि परिसरातील इतर गावांतील नागरिकांसाठी कोपरगाव शहरात ये-जा करण्याचा हा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार, व्यापारी तसेच वाहनधारक मोठ्या प्रमाणावर या रस्त्याचा वापर करतात. मात्र, रस्त्याचे काम अपूर्ण असल्याने नागरिकांना दररोज प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या रस्त्यावर केवळ खडी टाकून ठेवण्यात आली असून, प्रत्यक्ष काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे वाहनचालकांना कसरत करत प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाने या रस्त्याची तातडीने पाहणी करून रखडलेले काम सुरू करावे, अशी मागणी शरदराव थोरात यांनी केली आहे.

नागरिकांची गैरसोय दूर करून सुरक्षित आणि दर्जेदार रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने आता तरी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# राहुरीतील बिहाणी विद्या मंदिराचा वीजपुरवठा दहा दिवसांपासून बंद!

## वीजबिल थकबाकीचा विद्यार्थ्यांना फटका
## पिण्याच्या पाण्याचीही गैरसोय, शिक्षकांचे वेतन रखडले

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** शहरातील कै. लालाशेठ बिहाणी विद्या मंदिराचा वीजपुरवठा वीजबिलाच्या थकबाकीमुळे गेल्या दहा दिवसांपासून खंडित करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्गातील पंखे, दिवे आणि पिण्याच्या पाण्याअभावी गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे, प्रभारी मुख्याध्यापकांना अधिकृत स्वाक्षरीचे अधिकार नसल्याने शिक्षकांच्या वेतनाचे बिलही रखडल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे शाळेच्या प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

कै. लालाशेठ बिहाणी विद्या मंदिर ही राहुरी शहरातील महत्त्वाची शैक्षणिक संस्था आहे. मात्र, गेल्या दहा दिवसांपासून वीजपुरवठा बंद असल्याने वर्गातील पंखे व दिवे बंद आहेत. तसेच वीज नसल्यामुळे नगरपालिकेच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम झाला असून, विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी येत आहेत. सध्या नगरपालिकेमार्फत टँकरने पाणीपुरवठा करून तात्पुरती व्यवस्था केली जात असल्याचे समजते.

शाळेचे मुख्याध्यापक दीर्घ रजेवर असल्याने प्रभारी मुख्याध्यापकांकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मात्र, त्यांना अधिकृत स्वाक्षरीचे अधिकार मिळाले नसल्याने प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण झाले आहेत. परिणामी शिक्षकांच्या वेतनाचे बिलही प्रलंबित असल्याची माहिती आहे. याशिवाय शाळेची अधिकृत वेळ दुपारी १२ ते सायंकाळी ५.३० अशी असताना शिक्षकांना सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत थांबावे लागत असल्याची माहिती असून, याबाबतही नाराजी व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळणे ही शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. त्यामुळे संस्थेने तातडीने वीजबिलाचा प्रश्न सोडवून वीजपुरवठा पूर्ववत करावा, पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, तसेच प्रभारी मुख्याध्यापकांना आवश्यक अधिकार द्यावेत, अशी मागणी होत आहे.

गटशिक्षणाधिकारी, राहुरी तसेच जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने लक्ष घालावे, अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त होत आहे.

**प्रभारी मुख्याध्यापकांच्या अधिकारांचा प्रश्न ऐरणीवर**

विद्यमान मुख्याध्यापक दीर्घ रजेवर असल्याने ज्येष्ठ शिक्षकाकडे प्रभारी पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, अधिकृत स्वाक्षरीचे अधिकार नसल्याने शासकीय कागदपत्रे आणि प्रशासकीय कामे प्रलंबित आहेत. शिक्षकांच्या वेतनाचे बिलही रखडल्याने संस्थेच्या व्यवस्थापनाने तातडीने अधिकार प्रदान करून कामकाज सुरळीत करावे, अशी मागणी होत आहे.


**:: जाहीर प्रकटन ::**

तमाम जनतेस विशेषतः खडके ता. नेवासा,, जि. अहिल्यानगर परिसरातील जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल नामे यांनी मौजे खडके ता. नेवासा हद्दीतील शेतीजमिन गट नं. ३/१/अ पैकी रवि राजु भालेराव यांचे नावावरील क्षेत्र ३.००.०० आर.चौ.मी. याची चतुसिमा रेकॉर्डप्रमाणे क्षेत्र तसेच मौजे खडके, ता. नेवासा येथील गट नं. ३/१ पैकी गोविंद उमाजी तागड यांचे नावावरील क्षेत्र ० हे ०४ आर, याची चतुसिमा रेकॉर्डप्रमाणे ही मिळकत आमचे अशिल यांनी खरेदी बाबत सौदा करुन विसार म्हणुन काही रक्कम अदा केलेली आहे तसेच सदर मिळकत खरेदी विक्री बाबत मिळकतीचे मुळ मालक यांनी कुटूंबातील सर्व सदस्यांसी संपुर्ण चर्चा करुन सदर मिळकत आमचे अशिलास विक्री करण्याचे एकमुखी ठरविले असुन व्यवहार निश्चीत केला आहे. वरील संपुर्ण मिळकती बाबत, कोणाचे काही हितसंबंध, गहाण, दान, लिन, लिज, पुर्व साठेखत, विसारपावती, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जनरल मुखत्यारपत्र, तसेच रस्ता व चतुःसिमा अगर नोटराईज दस्त, करारनामा, क्षेत्र, अगर तत्सम स्वरुपाचे दस्तऐवज तसेच मिळकती संबंधी काहीही आर्थिक देणे, घेणे, बँका, पतसंस्था, अगर वित्तीय संस्थेचे असलेले कर्ज, तसेच, हरकती, न्यायालयीन वाद अगर स्थगिती, हुकूमनामा प्रलंबित दावे, काही हरकती तक्रारी असल्यास हे जाहीर प्रकटन प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत आमचे कार्यालयात समक्ष अथवा लेखी स्वरुपात खुलासा सादर करावा, मुदतीत खुलासा/म्हणने प्राप्त न झाल्यास सदर मिळकती बाबत कोणाचे काही एक हितसंबंध व देणे घेणे, म्हणने, हरकती, तक्रारी नाही असे समजुन आमचे अशिल उपरोक्त मिळकतीचे कायम खरेदीखत मुदतीत अधिकृत दुय्यम निबंधक कार्यालय येथे नोंदवुन घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकतीं, तक्रारींचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी, सदरचे जाहीर प्रकटन माहितीस्तव प्रसिध्द केले असे.

ठिकाण
नेवासा
दिनांक : ३०/१०/२०२६

शिक्का

सही/-
ॲडव्होकेट नेवासा कोर्ट
ॲड. रविंद्र उत्तम पागिरे
Reg. No.MAH/6567/2020 B.A..LL.B.
जिल्हा व सत्र न्यायालय नेवासा जि. अहमदनगर
मो.नं.९६ २३ १२ ८१ १२

## पान १ वरुन

### शिर्डीत उपवर्गीकरणाविरोधात हजारो भीमसैनिकांचा महामोर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हैदराबादला सभा झाली आणि हैदराबादच्या सभेमध्ये पंतप्रधान मोदी म्हणाले की आम्ही सत्तेवरती आलो तर एस सी समाजात उपवर्गीकरण करू. याचा मेन किडा पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्या डोयात आहे. १ ऑगस्ट २०२४ ला सुप्रीम कोर्टाचा निकाल आला निकाल गवईंचे यांनी दिला उपवर्गीकरणाला सुप्रीम कोर्टात ब्राह्मण समाजाची महिला बेला त्रिवेदी यांनी विरोध केला गवई चीफ जस्टिस होते, त्यांनी उपवर्गीकरण करा सांगितलं. ३१ राज्यांमध्ये फक्त ४ राज्यांनी उपवर्गीकरण केलं, ५ वे राज्य अजून नाही. त्यामुळे देशभर उपवर्गीकरण होतंय असं काही नाही. उत्तर प्रदेशमध्ये योगी उपवर्गीकरण करू शकत नाही. २५ राज्यांनी उपवर्गीकरण केलेलं नाही, महाराष्ट्रामध्ये उपवर्गीकरण करण्याची घाई काय आहे? देवेंद्र फडणवीसांना विचारलं तर त्याचं उत्तर त्यांच्याकडे नाही. आपापली वोट बँक तयार करण्यासाठी जातीपातीचं राजकारण भाजपा करत आहे .संघ परिवार म्हणतो आम्ही जाती मानत नाही, भागवत म्हणतात आम्ही जाती मानत नाही, मग बीजेपी जातीचं राजकारण का करते? याचं उत्तर मोहन भागवतांनी द्यावं, याचं उत्तर संघाच्या सरसंघचालकाने द्यावं, पण त्याचं उत्तर त्यांच्याकडे नाही. जेव्हा देवेंद्र फडणवीस आणि दोन-चार आमच्या मातंग बांधवांना, सगळ्या मातंगांना नाही, सगळा मातंग समाज त्यांच्यासोबत नाही. जेव्हा ३ जूनला पहिल्यांदा मुंबईत मोर्चा झाला, आम्ही मुंबईतल्या सर्व पक्ष संघटनेच्या लोकांनी एकत्र येऊन तो मोर्चा काढला, तेव्हा दुसऱ्या दिवशी विधानसभेमध्ये देवेंद्र फडणवीस म्हणाले लागलं, आम्ही उपवर्गीकरणाचा अजून निर्णय घेतला नाही . महाराष्ट्रात आंबेडकरी लोकांचे मोर्चे सुरू झाले तसे दुसऱ्यांचे मोर्चे सुरू झाले. त्याला किती फंडिंग मिळायला लागलं? रमेश कदम त्यांनी सांगितलं, मातंग समाजाच्या मोर्च्याला अनेक नेत्यांनी करोडो रुपये दिले आणि करोडो रुपये लाटण्यासाठी त्यांनी आंदोलन चालवलं. मुख्य लढा आंबेडकरी चळवळ तोडण्याचं षडयंत्र करणारा बीजेपी असो, आरएसएस वाला असो त्यांच्या विरोधात आहे.क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवेंच्या शिफारशीवरून महाराष्ट्रामधल्या भूमिहीन मातंगांना महाराष्ट्र सरकारनं किती जमीन वाटप केली? एका-दोन आमदारकीसाठी, एका-दोन एमएलसीसाठी सगळ्या समाजाचं वाटोळं करू नका .आमचा लढा हा मातंगाच्या विरोधात नाही, कुठल्या व्यक्तीच्या विरोधात नाही, कुठल्या समाजाच्या विरोधात नाही. आमचा लढा देवेंद्र फडणवीस सरकारच्या विरोधात आहे, महाराष्ट्रातल्या बीजेपी सरकारच्या विरोधात आहे.

### ८६ हजार कोटींच्या थकीत देयकांसाठी कंत्राटदारांचे राज्यव्यापी फोन आंदोलन

कामांचा हक्काचा मोबदला मागत आहोत. आता आश्वासन नको, प्रत्यक्ष निधी आणि पैसे द्या,' अशी भूमिका पदाधिकाऱ्यांनी मांडली. या आंदोलनाची माहिती महासंघाचे राज्याध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले, अभियंता संघटनेचे महासचिव राजेश देशमुख, जिल्हाध्यक्ष समीर शेख, सचिव अक्षय कराड, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष गणेश श्रीराम यांच्यासह अविनाश ओव्हळे, श्रीकांत लांडे, शर्मान शेख, सिद्धार्थ खेडकर, वैष्णव मिसाळ आणि सागर शिंदे यांनी दिली. कंत्राटदारांचे शासनाला पाच सवाल १. ८६ हजार कोटींच्या थकीत देयकांसाठी निधी कधी उपलब्ध होणार? २. दोन वर्षांपासून रखडलेल्या बिलांचा प्रश्न कधी मार्गी लागणार? ३. आर्थिक संकटातील कंत्राटदारांना दिलासा कोण देणार? ४. दिवाळीपूर्वी प्रत्यक्ष रक्कम खात्यावर जमा होणार का? ५. राज्यव्यापी आंदोलनानंतर तरी शासन ठोस निर्णय घेणार का?

### कर्जत, अकोले, पारनेरमध्ये दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला..!

लक्ष लागले आहे. मतदारसंघनिहाय मर्यादित मतदारसंख्या असल्याने उमेदवारांनी मतदारांना सहलीवर पाठविण्याची खबरदारी घेतली आहे. कर्जत आणि जामखेडमधील मतदार यापूर्वीच सहलीवर गेले असून, पारनेरमधील मतदारांनाही खासदार लंके यांनी सहलीवर पाठविल्याची चर्चा आहे. दुसरीकडे सुजय विखे यांच्या नेतृत्वाखाली तालुकानिहाय मेळावे घेऊन विखे-थोरात पॅनलकडून विजयासाठी प्रयत्न सुरू आहेत. संगमनेर, कोपरगाव, नगरमधील मते निर्णायक संगमनेर तालुयात सर्वाधिक ७१५ मतदार असून, कोपरगावमध्ये ५२९, नगरमध्ये ३९१, श्रीगोंद्यात २९९, नेवासामध्ये २४६, अकोले २३१, पारनेर २२७, कर्जत १६८, श्रीरामपूर १४७, पाथर्डी १३१, शेवगाव ११७ आणि जामखेडमध्ये ११५ मतदार आहेत. सेवा संस्था मतदारसंघात संबंधित तालुयातील मतदार मतदान करतील; तर उर्वरित सात जागांसाठी जिल्हाभरातील मतदार मतदान करणार आहेत.

### जागेच्या नोंदीसाठी १ लाख २५ हजारांची लाच! ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर गुन्हा

२०२६ रोजी कोळगाव येथील हॉटेल स्वाद येथे पडताळणी करण्यात आली. या पडताळणीत संबंधित अधिकाऱ्याने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याचे विभागाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. त्यानंतर ३० ऑटोबर रोजी बेलवंडी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### प्रतिबंधित तंबाखू प्रकरणी 'एफडीए'चे चार अधिकारी निलंबित

ही कारवाई करण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. ठाणे येथील 'हाय स्ट्रीट इम्पेस एलएलपी' आणि मावळ तालुयातील 'सोएस इंडिया प्रा. लि.' या कंपन्यांवरील कारवाईत अधिकाऱ्यांकडून गंभीर अनियमितता झाल्याच्या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात आली. त्यानंतर अन्न सहआयुक्त दिगंबर भोगावडे, अन्न सहायक आयुक्त यदुराज दहातोंडे, अन्न सुरक्षा अधिकारी अशोक इलागेर आणि सी. आर. स्वामी या चार अधिकाऱ्यांना ३० ऑटोबर रोजी जारी आदेशानुसार निलंबित करण्यात आले. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांनुसार त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीही सुरू करण्यात आली आहे.

'हाय स्ट्रीट इम्पेस' प्रकरणात उत्पादनावर हुक्का ओढण्यासाठी वापर असल्याचा उल्लेख असतानाही अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली. या कारवाईसाठी अधिकाऱ्यांवर दबाव आणल्याचा उल्लेख चौकशी अहवालात आहे. कारवाईस नकार देणाऱ्या सहायक आयुक्त पी. पी. सूर्यवंशी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची बाबही समोर आली आहे.

दरम्यान, मावळ तालुयातील टाकवे येथील 'सोएस इंडिया' कंपनीवर २ जानेवारी २०२६ रोजी कारवाई करून ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ रुपये किमतीचा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला होता. या प्रकरणांसह संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची तपासणी करण्यासाठी आणखी २१ अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी केली जाणार आहे. सार्वजनिक आरोग्याशी संबंधित कारवाईत कायदेशीर प्रक्रिया आणि प्रशासकीय उत्तरदायित्वाला प्राधान्य दिले जाईल, असे मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले.

# हक्काच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष तीव्र

## सहा ते सात ठिकाणी रास्ता रोको

## आमदार रमेश बोरणारेंचा आंदोलनात उतरण्याचा इशारा; उपोषण मात्र सुरूच

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : नांदूर मधमेश्वर कालव्यातून वैजापूर व गंगापूर तालुक्याला हक्काचे पाणी मिळावे, या मागणीसाठी शेतकऱ्यांचा संघर्ष तीव्र झाला आहे. आमरण उपोषण सुरू असतानाच शुक्रवारी तालुक्यातील सहा ते सात ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आल्याने पाणीप्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आगामी बैठकीत पाणी सोडण्याबाबत सकारात्मक निर्णय झाला नाही, तर सर्वांच्या आधी मी स्वतः रस्त्यावर उतरून आंदोलनात सहभागी होईन, असा इशारा आमदार रमेश बोरणारे यांनी उपोषणस्थळी दिला. मात्र, केवळ बैठकीच्या आश्वासनावर समाधान न मानता आंदोलकांनी उपोषण सुरूच ठेवले आहे.

नांदूर मधमेश्वर कालव्यातून सिंचनासाठी आवर्तन सोडण्याचा निर्णय होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. खरीप हंगामातील अडचणींनंतर आता रब्बी हंगामही पाण्याअभावी धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी तातडीने आवर्तने सोडण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. आमदार बोरणारे यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब जगताप व राजेंद्र साळुंके यांच्यासह उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याची माहिती देताना, वैजापूर व गंगापूर तालुक्यांसाठी रब्बी हंगामात दोन आणि पिण्यासाठी दोन, अशी एकूण चार आवर्तने सोडण्याची मागणी केल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी नाशिक येथे होणारी बैठक राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे रद्द झाली. आता येत्या दोन दिवसांत छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक घेण्याचे आश्वासन मिळाले आहे. या बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल, असे बोरणारे यांनी स्पष्ट केले. मात्र, निर्णय झाला नाही तर आंदोलनात स्वतः सहभागी होण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

**लोकप्रतिनिधी म्हणून बोरणारेंची नाराजी**

चर्चेदरम्यान बोरणारे यांनी पाणीप्रश्नाबाबत आपल्याला माहिती न दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. अडचण असल्यास किमान आपल्याला कळवायला हवे होते, असे ते म्हणाले. दरम्यान, आधार जलदूत समितीचे पंडित शिंदे यांच्या नेतृत्वाखाली २७ ऑक्टोबरला मोर्चा काढण्यात आला होता. मागण्यांवर ठोस आश्वासन न मिळाल्याने त्याच दिवशी सायंकाळपासून कालवा विभागाच्या कार्यालय परिसरात आमरण उपोषण सुरू करण्यात आले. तीन दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणाला रास्ता रोको आंदोलनाची जोड मिळाल्याने प्रशासनासमोरील आव्हान वाढले आहे. प्रत्यक्ष पाणी सोडण्याचा निर्णय होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका पंडित शिंदे यांनी कायम ठेवली आहे.

## लोणी बुद्रुकमध्ये उद्यापासून तीन दिवसाआड पाणीपुरवठा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक गावावर पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उपलब्ध पाणीसाठा जपून वापरण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, १ नोव्हेंबरपासून गावात तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. तसेच पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही ग्रामपंचायतीने दिला आहे. ग्रामपंचायतीने ३० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केलेल्या सूचनेद्रे ग्रामस्थांना पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन केले आहे. पिण्यासाठी आणि दैनंदिन गरजांसाठी आवश्यक तेवढेच पाणी वापरावे. उपलब्ध पाणीसाठ्याचा अपव्यय टाळून भविष्यातील संभाव्य टंचाई लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला पाणी मारणे, वाहने धुणे, जनावरांना रस्त्यावर आंघोळ घालणे अशा प्रकारांना बंदी घालण्यात आली आहे. असे करताना कोणी आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. घरगुती पाणीबचतीसाठी नळाला तोटी बसविणे, पाणी भरल्यानंतर नळ त्वरित बंद करणे आणि गरजेनुसारच पाणी वापरणे अशा उपाययोजना करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. तीन दिवसाआड पाणीपुरवठा होणार असल्याने नागरिकांनी पाण्याचा साठा आणि वापराचे नियोजन करणे आवश्यक आहे. पाणीबचत ही केवळ ग्रामपंचायतीची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आज पाणी जपले तरच उद्याचे संकट टाळता येईल. त्यामुळे ग्रामस्थांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून पाणीबचत मोहिमेत सहकार्य करावे, असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्रातील चारा परराज्यात पाठविण्यास बंदी बायोफ्युएल,वीजनिर्मितीसाठीही प्रतिबंध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई,** : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर फडणवीस सरकारने राज्यातील चारा परराज्यात पाठवण्यावर कायदेशीर बंदी घातली असून, चाऱ्याचा वापर बायोफ्युएल किंवा वीजनिर्मितीसारख्या कामांसाठी करण्यास पूर्णपणे प्रतिबंध करण्यात आला आहे. याशिवाय दुष्काळग्रस्त भागात उभारल्या जाणाऱ्या चारा छावण्यांमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी बायोमेट्रिक, क्यूआर कोड आणि २४ तास सीसीटीव्हीची हायटेक डिजिटल नजर ठेवण्यात येणार आहे. दुष्काळाच्या काळात चाऱ्याचा काळाबाजार रोखून शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी शासनाने दर निश्चित केले आहेत. त्यानुसार सुक्या चाऱ्यासाठी कमाल १२ रुपये प्रति किलो आणि मुरघासासाठी कमाल ८ रुपये प्रति किलो असा आधारभूत दर निश्चित करण्यात आला आहे. (यात वाहतूक खर्च समाविष्ट नाही). तसेच चाऱ्याची टिकावू क्षमता पाहता शक्यतो सुका चारा खरेदी करण्याला प्राधान्य दिले जाणार आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत व अभ्यासगटाच्या शिफारसींनुसार हे निर्णय घेण्यात आले

## कैलास बापू कोते यांना साई संस्थानचे अध्यक्ष करा; आप्पासाहेब कोते यांची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते यांची श्री साईबाबा संस्थानच्या अध्यक्षपदी नियुक्ती करावी, अशी मागणी शिर्डी सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन आप्पासाहेब कोते यांनी केली आहे. गावचे प्रथम सरपंच कै. रामचंद्र कोते पाटील यांच्यानंतर कोते परिवाराला संस्थानचे अध्यक्षपद मिळाले नाही. त्यामुळे कैलास बापू कोते यांच्या रूपाने परिवाराला योग्य सन्मान मिळावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. कैलास बापू कोते यांचा नुकताच ६३ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त त्यांच्या निवासस्थानी शिर्डी शहरासह तालुक्यातील सर्वपक्षीय नेते, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिकांनी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव करण्यात आला. आप्पासाहेब कोते म्हणाले, कैलास बापू यांनी तब्बल १५ वर्षे शिर्डीचे नगराध्यक्षपद भूषविले. त्यांच्या नेतृत्वाखाली शहराच्या विकासाला चालना मिळाली. अडीच ते तीन हजार मुलींचे सामुदायिक विवाह घडवून आणण्याचे मोठे सामाजिक कार्य त्यांनी केले आहे. सर्वसामान्यांशी असलेला संपर्क, कार्यकर्त्यांची मजबूत फळी आणि दूरदृष्टी ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत.ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ते कार्यरत आहेत. कैलास बापू यांना साई संस्थानचे अध्यक्षपद मिळाल्यास शिर्डी शहरासह जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागेल, असा विश्वासही आप्पासाहेब कोते यांनी व्यक्त केला. त्यांच्या या मागणीमुळे साई संस्थानच्या अध्यक्षपदाच्या चर्चेला नव्याने सुरुवात झाली आहे.

## राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत त्रिमूर्तीच्या दोन खेळाडूंना रौप्यपदके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नागपूर येथे दि. २३ ते २५ ऑक्टोबर २०२६ दरम्यान पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत त्रिमूर्ती रायफल शूटिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेत त्रिमूर्तीच्या आठ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी दोन खेळाडूंनी रौप्यपदके पटकावत राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात स्थान मिळवले.

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी आर्यन प्रशांत खताळ याने १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात रौप्यपदक मिळवून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता संपादन केली. तसेच महारुद्र नांगरे याने १० मीटर ओपन साईट रायफल प्रकारात रौप्यपदक पटकावत राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात आपले स्थान निश्चित केले.

या यशस्वी खेळाडूंचे त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुमतीताई घाडगेपाटील, उपाध्यक्षा स्नेहलताई चव्हाण-घाडगेपाटील, सहसचिव डॉ. श्रुती आमले -घाडगे पाटील, विश्वस्त चेतन चव्हाण-पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमले पाटील यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. राष्ट्रीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून संस्थेचा तसेच महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

याप्रसंगी प्राचार्य सोपान काळे, प्राचार्या दीपाली बाविस्कर,प्राचार्य प्रशील जोसेफ , वित्त विभागप्रमुख अनिता जाधव, एनडीए प्रमुख कर्नल के. पी. सिंग, समन्वयक अनुराधा गोरे, सीनियर कॉलेजचे प्राचार्य चांगदेव आरसुळे , निवासी प्राचार्य एकनाथ कापसे, उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे, विभाग प्रमुख अशोक गाडे, अशोक गाडे, संतोष राऊत, राजेंद्र कात्रस यांच्यासह संस्थेतील विविध पदाधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या खेळाडूंना रायफल शूटिंग प्रशिक्षक छबुराव काळे यांच्यासह संभाजी निकाळजे, अभिजीत दळवी, महादेव काकडे, गणेश शिंदे, अशोक पानकडे, संदीप वाघमारे, विजय गायके, साहेबराव दाने, प्रशांत खताळ, परमेश्वर कसाळ , आसिफ शेख, अमीर शेख, निलेश पैठणे आणि समीर पठाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## डॉ.ऋतुजाचे एमडी रेडिओलॉजी पदवीत्तर शिक्षण पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथील ऋतुजा विश्वनाथ मिसाळ हिने वैद्यकीय क्षेत्रातील एम.बी.बी.एस. पदवी नंतर 'एमडी रेडिओलॉजी' ही पदवीत्तर पदवी संपादन केली आहे. ऋतुजा हिने बारावी शास्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर गुणवत्तेच्या जोरावर पुणे येथील बी.जे. शासकीय मेडिकल महाविद्यालयामधून एम.बी.बी.एस.ची पदवी मिळविली होती. एम.बी.बी.एस. पदवी नंतर तीने नांदेड येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालया मध्ये एमडी रेडिओलॉजीचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून डॉ.ऋतुजाने भेंडा गावाच्या नावलौकिकात मानाचा तुरा रोवला आहे. डॉ.ऋतुजा हिस आई राणी मिसाळ,वडिल डॉ.विश्वनाथ मिसाळ,मावशी प्राथमिक शिक्षिका मनीषा धनापुणे, काका मुख्याध्यापक कैलास धानापुने, विष्णू मिसाळ यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक अशोक मिसाळ, उद्योजक बापूसाहेब नजन, ऋतुजाचे पती डॉ. प्रवीणसिंह हाके, सासरे शंकरराव हाके, दिर विजयसिंह हाके यांनी तीचे अभिनंदन केले.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME DEDGAONKAR VIJAY AMKRISHNA (BEFORE NAME) TO NEW NAME AS VIJAY RAMKRUSHNA DEDGAONKAR ( AADHAAR NO.- 7481-0014-3573 ) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOLHAR PLACE : KOLHAR DATE : 30/10/2026

## साहित्य, काव्य आणि सामाजिक सलोख्याचा रेणुका आश्रमात संगम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : सामाजिक सलोखा, साहित्याची आवड आणि नात्यांमधील स्नेह वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने श्रीरामपूर अँकर्स असोसिएशनच्या वतीने वडाळा महादेव येथील रेणुका आश्रमात कवी संमेलन व स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. 'आई' या विषयावर सादर झालेल्या कवितांनी उपस्थितांना भावविश्वाची अनुभूती दिली. यावेळी नूतन कार्यकारिणीचा परिचय, भूमिपुत्र व साहसीवीरांचा सन्मान आणि सामाजिक उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मातोश्री नलिनी आईसाहेब व प्राचार्या ऊषा गाडेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. पत्रकार राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रकाश कुलथे, ज्येष्ठ मार्गदर्शक सुकदेव सुकळे, प्रा. सुभाष लिंगायत आणि असोसिएशनचे नूतन अध्यक्ष सलीमखान पठाण उपस्थित होते.

यावेळी प्रकाश कुलथे यांनी अँकर्स असोसिएशनने गेल्या चार वर्षांत शिबिरे, कार्यशाळा आणि भूमिपुत्र गौरव यांसारखे समाजाभिमुख उपक्रम राबविल्याचे सांगितले. संघटनेच्या अध्यक्षपदाची निवड सामाजिक सलोख्याचे अनोखे उदाहरण असल्याचेही त्यांनी नमूद केले. अध्यक्ष सलीमखान पठाण यांनी प्रास्ताविकातून संघटनेच्या कार्याचा आढावा घेतला. भूमिपुत्र व साहसीवीर डॉ. मुकुंद शिंदे यांच्यासह नूतन कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला.

कवी बाबासाहेब पवार, महेश टंकसाळे, शीतल गुंजाळ, निवृत्त प्राचार्य कवडे, विलास कुलकर्णी, राजेंद्र देसाई, गणेश पिंगळे, मयूरी थावरे, संगीता फासाटे आणि प्रा. लक्ष्मण कोल्हे यांनी कविता व गायनातून आईच्या मायेचे, त्यागाचे आणि संस्कारांचे दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संगीता फासाटे यांनी केले. संयोजन व आभार प्रदर्शन प्रा. ॲड. आदिनाथ जोशी यांनी केले. ऊषा गवळी-गाडेकर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ९ कोटी शेतकऱ्यांना १८,६९० हजार कोटी किसान हप्ता वितरित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : गुजरात येथील बनासकांठा येथून देशातील ९.३४ कोटीं शेतकऱ्यांना १८,६९० कोटी रुपयांचा पंतप्रधान किसान सन्माननिधी योजनेचा २४ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वितरित केला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपन विद्यापीठात शेतकरी, शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले.

याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे, कृषि विस्तार शिक्षणाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मृणाल आजोतीकर, जनसंपर्क अधिकारी तथा प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन सदाफळ, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव संजय पाटोळे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. मनोहर धादवड उपस्थित होते.

यावेळी डॉ. प्रशांत बोडके यांनी नैसर्गिक शेती पध्दती, सेंद्रिय शेतीतील एकात्मिक पीक व्यवस्थापन या विषयावर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पंडित खर्डे यांनी केले तर आभार डॉ. मृणाल अजोतीकर यांनी मानले. याप्रसंगी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, विद्यार्थी तसेच तांभेरे व कानडगाव येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधनवार्ता

### अक्षय येळवंडे

**सोनई** -श्री शेत्र शनिशिंगणापूर येथील लोकप्रिय व दांडगा संपर्क असणारा युवा कार्यकर्ते अक्षय येळवंडे (वय २८) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, बहिणी, बंधू, आजोबा आहे. शनेश्वर देवस्थानचे माजी सरचिटणीस व सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी बाळकृष्ण येळवंडे यांचा नातू, तर रमेश येळवंडे यांचा मुलगा होत.

### अशोकराव कोते



**शिर्डी** : श्री साई नागरी पतसंस्थेचे संस्थापक अशोकराव खंडूजी कोते यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. ते शिर्डी परिसरातील एक जेष्ठ सहकार महर्षी म्हणून परिचित होते. त्यांनी स्थापन केलेल्या श्री साई नागरी पतसंस्थेच्या माध्यमातून त्यांनी सहकार क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, २ भाऊ असा परिवार आहे.

**माधुरी बाजार डे / नाईट**

४५७ ३४९ १२३ — ६-० — १२७ ४६० ५७८ | ३४-५८-२७-६९-८२

३-६-८

| माधुरी बाजार डे | माधुरी बाजार नाईट |
| --- | --- |
| ६७९ | १४० |
| २९ | ५७ |
| २७० | ३६८ |

dpbosssss.live Mydpboss.com

# शेवगावतील गहिले वस्तीच्या पाणीप्रश्नावर महिलांचा हंडा मोर्चा!

## दोन दिवसांत पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याचे प्रांताधिकारी मते यांचे आश्वासन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** शेवगाव शहरातील गहिले वस्ती येथील पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनला असून, संतप्त महिलांनी आज गुरुवार दि २९ रोजी शेवगाव तहसील वर हंडा मोर्चा काढून प्रशासनाचे लक्ष वेधले. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची होणारी वणवण थांबवून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या प्रश्नावर प्रांताधिकारी मते यांनी येत्या दोन दिवसांत पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याचे आश्वासन दिले.

पिण्याचे पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असतानाही गहिले वस्तीतील रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाण्यासाठी वारंवार भटकंती करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. अखेर या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महिलांनी हंडे घेऊन मोर्चा काढला.

यासंदर्भात शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांची या संदर्भात प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी त्यांचा भ्रमणध्वनी उचलला नाही त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही.

या मोर्चात शिवसेनेचे नेते अरुण मुंढे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दत्तात्रय फुंदे, वंचित बहुजन आघाडीचे प्रीतम गर्जे, नवनाथ कवडे यांच्यासह परिसरातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. गहिले वस्तीतील पाणीटंचाई तातडीने दूर करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करावा, अशी मागणी उपस्थितांनी केली.

दरम्यान, प्रांताधिकारी मते यांनी येत्या दोन दिवसांत पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे या आश्वासनाची प्रशासनाकडून प्रत्यक्षात कितपत अंमलबजावणी होते, याकडे गहिले वस्तीतील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**आश्वासन नको, प्रत्यक्ष पाणी द्या!**

पाणीटंचाईमुळे नागरिकांना करावी लागणारी वणवण थांबवून गहिले वस्तीमध्ये नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी अपेक्षा रहिवाशांकडून व्यक्त होत आहे. प्रशासनाने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृतीतून पाणीप्रश्न सोडवावा, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

द • ख • ल

### श्री भवानी माता विद्यालयात पर्यावरण पूरक आकाश कंदीलांनी वेधले सर्वांचे लक्ष!

**टाकळी मानूर :** येथील श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर , मनमोहक व पर्यावरण पूरक आकाश कंदील बनविण्याची अगदी चुरस निर्माण झाली होती. प्रत्येकाने सुंदर आकाश कंदील व सजविलेल्या पणत्या बनवून आणल्या. आकाश कंदील स्पर्धेत १) अक्षदा धोंडीराम मासाळ २) प्रसाद देविदास गाडे ३) अंकिता रविंद्र नगरकर या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक आकाश कंदील तयार करून पहिले तीन क्रमांक पटकाविले. विद्यालयाचे प्राचार्य देविदास सोनटक्के व कलाशिक्षक निलेश गणगले यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या आकाश कंदील व पणत्यांचे सुंदर संकलन करून सर्व विद्यार्थ्यांचे फोटोसेशन करण्यात आले .याप्रसंगी गणगले सर तंत्रस्नेही प्रवीण गावडे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू भगिनी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सुंदर कौशल्याबद्दल कौतुक केले. आकाश कंदीलाच्या प्रदर्शनाने विद्यालयाच्या सौंदर्यात आगळीवेगळी भर पडली होती. सर्व विद्यार्थी आनंदी उत्साही वातावरणाने या कार्यक्रमात सहभागी झाले होते .त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदी व हसऱ्या भावना सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या.

### साईदिप, सह्याद्री हॉस्पिटलमधील कथित कामगार अन्यायाविरोधात छावा संघटनेचे आंदोलन!

**अहिल्यानगर :** शहरातील साईदिप, सह्याद्री हॉस्पिटल तसेच विराज इस्टेट, तारकपूर परिसरातील हॉस्पिटल व्यवस्थापनाकडून कामगार कायद्यांचे कथित उल्लंघन होत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. कामगारांना किमान वेतन, भविष्यनिर्वाह निधी (पीएफ), बोनस आणि नियमानुसार रजा मिळत नसल्यासह अनेक गंभीर तक्रारी आंदोलनकर्त्यांनी मांडल्या. या प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित हॉस्पिटल प्रशासनावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.या आंदोलनात अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, छावा संघटना भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुभाष काकडे, जिल्हाध्यक्ष उत्तम पवार, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, स्वराज्य पक्षाचे जिल्हाप्रमुख योगेश शेंडगे, जनार्दन कंद, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, आबा राठोड, किसन शिरडकर, मच्छिंद्र पाटोळे, साहेबराव पाटोळे, दत्ता वामन, ज्योती माळी, मुक्ता शेडाळे, अभिषेक घोडके, रामदास मोढवे, विजया पवार, मालनबाई गरड, संगीता वाल्हेकर, एकनाथ दातीर, महादेव खामकर, विष्णू जरे, भानुदास ससे, बाळासाहेब फाटके आदी सहभागी झाले होते. या सर्व मागण्यांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जागरण-गोंधळ आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संघटनेने निवेदनातून दिला होता.

### सावेडीत मेंटेनन्सच्या वादातून सोसायटीतच रहिवाशावर लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला

**अहिल्यानगर :** शहरातील गुलमोहर रोडवरील क्रिस्टल टॉवर शिलाविहार परिसरात मेंटेनन्सच्या वादातून एका रहिवाशावर लाकडी दांडक्याने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत.मेश्वर उध्दव शिरसाठ (वय ४२, रा. क्रिस्टल टॉवर, शिलाविहार, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर) असे फिर्यादीचे नाव आहे.तर विजय नामदेव माने (रा. क्रिस्टल टॉवर, शिलाविहार, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रामेश्वर शिरसाठ हे आपल्या मुलीसह सोसायटीच्या पार्किंगमध्ये उभे असताना हा प्रकार घडला. आरोपी विजय नामदेव माने हा अचानक फिर्यादीच्या पाठीमागून आला आणि त्याने विनाकारण वाद घालण्यास सुरुवात केली.तुला दाखवतोच, तू खूप जास्त शहाणा झाला आहेस, मला मेंटेनन्स मागतो का? असे म्हणून आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ केली.संतापलेल्या आरोपीने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत हातातील लाकडी दांडक्याने कमरेवर वार करून गंभीर जखमी केले.या झटापटीदरम्यान फिर्यादीच्या गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची चैन खाली पडून गहाळ झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली.या मारहाणीत जखमी झालेल्या फिर्यादीवर शहरातील खन्ना क्लिनीक आणि संजीवनी अपघात रुग्णालयात उपचार करण्यात आले.याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

### नगर रेल्वे स्टेशनवर पोलिसांचा मॉकड्रिल

**अहिल्यानगर :** उघडकीस आली यंत्रणेची सतर्कता; चार 'अतिरेकी' जेरबंद अहिल्यानगर रेल्वे स्टेशन परिसरामध्ये आज सकाळी साडेअकराच्या सुमारास नियंत्रण कक्षाला अतिरेकी वावर असल्याचा फोन आल्यामुळे मोठी खळबळ उडाली आणि त्यानंतर नियंत्रण कक्षाने तात्काळ मोहीम राबवून संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधत पोलिसांना घटनास्थळी रवाना केले, ज्यामुळे स्टेशन परिसरात एकच तारांबळ उडाली असून अतिरेक्यांनी काही ठिकाणी वायरिंग करण्याचा प्रयत्न केला असला तरी पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आणि काही वेळ नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरून नेमके काय चालले आहे असा प्रश्न निर्माण झाला होता, मात्र संपूर्ण रेल्वे स्टेशनवर नाकाबंदी करत पोलिसांनी ताबा मिळवला आणि काही 'अतिरेकी' दिसून आल्यावर त्यांच्यावर कारवाई करत त्यांना ताब्यात घेण्यात आले तसेच काही ठिकाणी स्फोटाचे आवाजही ऐकायला आले, परंतु ही प्रत्यक्षात मॉक ड्रिल असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आणि या संपूर्ण कारवाईत शीघ्र कृती दल, दंगल नियंत्रण पथक, बंबशोधक पथक तसेच श्वान पथक सहभागी झाले असून अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल किती सतर्क आहे हे यावरून सिद्ध झाले आणि यादरम्यान चार 'अतिरेकी' पकडण्यात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे.

### राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी साईदीप भगतची निवड!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी साईदीप आदेश भगत याची १४ वर्षांखालील गटातील राज्यस्तरीय शालेय फुटबॉल संघात निवड झाली असून, तो राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. विशेष म्हणजे, अहिल्यानगर जिल्ह्यातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेला तो एकमेव खेळाडू ठरला आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर येथे राज्यस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या निवड चाचणीत राज्यातील १८० फुटबॉलपटूंनी सहभाग घेतला होता. त्यामधून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी १८ खेळाडूंची निवड करण्यात आली. या निवड यादीत अहिल्यानगर जिल्ह्यातील साईदीप आदेश भगत याने स्थान मिळविले. साईदीपने आपल्या खेळातील कौशल्य, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर ही कामगिरी केली आहे. या यशासाठी संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे, उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार, मुख्याध्यापिका अरुंधती भोकरे, माधवी जकल तसेच प्रशिक्षक प्रसाद पांडुळे, संजय गायकवाड आणि मंदा ताथेड यांचे मार्गदर्शन लाभले. साईदीपच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, प्रशिक्षक, विद्यार्थी आणि पालकांकडून त्याचे अभिनंदन होत असून, राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### दुष्काळाची तीव्रता वाढली ; कामरगावला टँकरची प्रतीक्षा!

#### लघुपाटबंधारे तलाव कोरडा; पाणीटंचाईचे संकट गडद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यात दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून अनेक गावांमध्ये पाणीटंचाईचे संकट गंभीर बनले आहे. कामरगाव येथील पाणीटंचाईची समस्या लक्षात घेऊन गावाला तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सिद्धांत आंधळे व सामाजिक कार्यकर्ते गोरख कातोरे यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे. गावाचा प्रमुख जलस्रोत असलेला लघुपाटबंधारे तलाव पूर्णपणे कोरडा पडल्याने ग्रामस्थांसह पशुपालक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

कामरगावमध्ये मोठ्या प्रमाणावर पशुधन असून गावाची लोकसंख्याही मोठी आहे. तलाव कोरडा पडल्याने त्याखालील विहिरींच्या पाणीपातळीतही मोठी घट झाली आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्यासह पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

पाण्याची समस्या लक्षात घेता कामरगाव ग्रामस्थांच्या वतीने गटविकास अधिकारी अक्षय गोर्डे यांना निवेदन देण्यात आले.

गटविकास अधिकारी अक्षय गोर्डे यांनी कामरगावचे ग्रामविकास अधिकारी आणि प्रशासक यांना तातडीच्या सूचना दिल्या. पाणीटँकर सुरू करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव त्वरित पंचायत समितीकडे सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच येत्या १५ दिवसांत कामरगावमधील दुष्काळग्रस्त भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिल्याची माहिती सिद्धांत आंधळे यांनी दिली.

कामरगाव मुख्य गावठाणासह कामाक्षा माता मंदिर परिसर, साठेवाडी, विठ्ठलवाडी, मुरलीनगर, कातोरवाडी आणि महानुभाववाडी या भागांमध्ये पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. या भागांतील ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### माजी सैनिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांसह विधानपरिषदेत 'स्वीकृत सदस्य' म्हणून आरक्षण द्या!

#### आ. कार्डिले यांची मुख्यमंत्री यांच्याकडे शिफारस

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ :** देशसेवेतून निवृत्त झाल्यानंतरही सामाजिक कार्यात अग्रभागी असणाऱ्या माजी सैनिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आणि विधानपरिषदेत स्वीकृत सदस्य म्हणून प्रतिनिधित्व मिळावे, अशी जोरदार मागणी जोर धरू लागली आहे. 'जय हिंद फाउंडेशन, अहिल्यानगर' व राज्यातील आजी-माजी सैनिक, शहीद परिवार आणि सैनिक परिवाराच्या वतीने करण्यात आलेल्या या मागणीची दखल घेत राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार अक्षय शिवाजीराव कार्डिले यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शिफारस पत्र पाठवले आहे.

जय हिंद फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. शिवाजी रखमाजी पालवे यांनी आ. अक्षय कार्डिले यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले होते की, महाराष्ट्रात जवळपास १६ लाख आजी-माजी सैनिक, शहीद परिवार व सैनिक परिवार मतदार आहेत. सैनिक अत्यंत अनुभवी, शिस्तबद्ध आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. मात्र, कौटुंबिक व आर्थिक परिस्थिती साधारण असल्याने त्यांना थेट निवडणुका लढवणे शक्य होत नाही. त्यांच्या या अनुभवाचा आणि प्रामाणिकपणाचा उपयोग जनसेवेसाठी व्हावा, यासाठी शासनाने अध्यादेश काढून सैनिकांना राजकीय आरक्षणाची संधी द्यावी, असा आग्रह या पत्रात धरण्यात आला होता.

माजी सैनिकांची ही मागणी अत्यंत रास्त आणि राष्ट्रहिताची असल्याचे ओळखून आमदार अक्षय कार्डिले यांनी तात्काळ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे याप्रकरणी पत्रव्यवहार केला.

### समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालयात जपानी जेएफई शोजी स्टील इंडियाची कॅम्पस ड्राइव्ह

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथे रांजणगाव एमआयडीसी मधील जपानी बहुराष्ट्रीय कंपनी, जेएफई शोजी स्टील इंडिया प्रा. लि. यांच्यातर्फे आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये महाविद्यालयातील ११ विद्यार्थ्यांची निवड झाली.महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या वतीने या निवड प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नामांकित औद्योगिक कंपनीत प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळविण्याची आणि करिअरची भक्कम सुरुवात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

या कॅम्पस ड्राइव्हमध्ये महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कंपनीच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांची तांत्रिक मुलाखत घेऊन त्यांच्या विषयज्ञानाची, तांत्रिक कौशल्यांची आणि औद्योगिक

क्षेत्रात काम करण्याच्या क्षमतेची पडताळणीकेली. इंटर्नशिप यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना कंपनीत पूर्णवेळ कर्मचारी म्हणून सामावून घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच औद्योगिक क्षेत्रातील कामकाजाची ओळख, व्यावहारिक अनुभव आणि रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण संधी मिळणार आहे.

कंपनीचे उपमहाव्यवस्थापक संजय कुमार सूर्यवंशी, एच.आर. मॅनेजर रेश्मा येळनुरे आणि प्रज्ञा भालेराव यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना कंपनीच्या कार्यपद्धतीची माहिती देताना स्टील प्रोसेसिंग उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, सीएनसी मशीनचे कार्य, तसेच कटिंग आणि स्लिटिंग लाईनच्या प्रक्रियेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

# दिवाळीच्या तोंडावर शेवगावमध्ये निकृष्ट धान्याचे वाटप!

## तांदळात जाळ्या, सोनकिडे आणि अळ्या; शिजवलेला भात अधिकाऱ्यांना खाऊ घालण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते पातेल्यासह तहसील कार्यालयात!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** दिवाळीच्या तोंडावर शेवगाव शहरातील स्वस्त धान्य दुकानांमधून शिधापत्रिकाधारकांना वाटप करण्यात येणाऱ्या धान्याच्या निकृष्ट दर्जाचा गंभीर प्रकार समोर आला आहे. कूपनवर मिळालेल्या तांदळामध्ये जाळ्या, सोनकिडे आणि मोठ्या प्रमाणात अळ्या आढळून आल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्त्यांनी आज शेवगाव तहसील कार्यालयात धाव घेतली. खराब तांदूळ आणि गहू प्रभारी प्रांताधिकारी म्हात्रे मॅडम यांना प्रत्यक्ष दाखवून संबंधित यंत्रणेला जाब विचारण्यात आला.

विशेष म्हणजे, हा तांदूळ नेमका किती खराब आहे, हे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते चक्क पातेल्यासह तहसील कार्यालयात पोहोचले होते. या तांदळाचा भात शिजवून तो संबंधित अधिकाऱ्यांना खाऊ घालण्याचा त्यांचा निर्धार होता. सर्वसामान्य नागरिकांच्या ताटात असे निकृष्ट धान्य जात असेल, तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

**तांदळात जाळ्या, सोनकिडे आणि अळ्या; नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर!**

शेवगाव शहरातील स्वस्त धान्य दुकानांमधून मिळालेल्या तांदळामध्ये जाळ्या, सोनकिडे आणि मोठ्या प्रमाणात अळ्या आढळून आल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणून दिले. दिवाळीसारख्या सणाच्या काळात गरीब आणि गरजू कुटुंबांना चांगल्या दर्जाचे धान्य मिळण्याऐवजी असे निकृष्ट धान्य मिळत असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे.

शासनाकडून सर्वसामान्य नागरिकांना अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाते. मात्र, ते धान्यच खराब दर्जाचे असेल, तर नागरिकांनी ते खायचे कसे? धान्याच्या गुणवत्तेची तपासणी न करता त्याचे वाटप केले जाते का? संबंधित पुरवठा यंत्रणा नेमके काय करत आहे? असे प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत.

**पातेल्यासह तहसील कार्यालयात धडक; अधिकाऱ्यांना भात खाऊ घालण्याची तयारी!**

निकृष्ट तांदळाच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी खराब तांदूळ आणि गहू सोबत आणले होते. तसेच या तांदळाचा भात शिजवून तो अधिकाऱ्यांना खाऊ घालण्यासाठी पातेलाही सोबत आणले होते. नागरिकांना ज्या दर्जाचा तांदूळ दिला जात आहे, त्याची प्रत्यक्ष जाणीव अधिकाऱ्यांना व्हावी, हा यामागील उद्देश होता.

सर्वसामान्य नागरिकांच्या वाट्याला असे धान्य येत असेल, तर प्रशासनाने याकडे केवळ कागदोपत्री बाब म्हणून न पाहता प्रत्यक्ष परिस्थितीची गंभीर दखल घ्यावी, अशी भूमिका सामाजिक कार्यकर्त्यांनी मांडली.

**प्रांताधिकारी सोनाली मात्रे मॅडम यांनी निवेदनकर्तेची तातडीने दखल घेत. आजच पत्र काढण्याच्या सूचना!**

संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांना यांना तातडीने बोलावून घेतले. तसेच निकृष्ट धान्याच्या प्रश्नावर त्वरित कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच खराब गहू आणि तांदूळ नाकारण्याबाबतचे पत्र आजच काढावे, अशा सूचना संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांना दिल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले.

शिधापत्रिकाधारकांना मिळणारे धान्य हे त्यांच्या कुटुंबाच्या अन्नाची गरज भागवण्यासाठी महत्त्वाचे असते. त्यामुळे नागरिकांना दर्जेदार आणि खाण्यायोग्य धान्य मिळणे गरजेचे आहे. धान्यामध्ये जाळ्या, सोनकिडे आणि अळ्या आढळत असतील, तर धान्याच्या साठवणुकीपासून ते वितरणापर्यंतच्या प्रक्रियेची तपासणी होणे गरजेचे आहे. शेवगाव शहरातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये वाटप होणाऱ्या धान्याच्या गुणवत्तेची तपासणी करावी, निकृष्ट धान्याचा पुरवठा थांबवावा, संबंधित जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी आणि नागरिकांना चांगल्या दर्जाचे धान्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. प्रशासनाने आजच पत्र काढण्याच्या सूचना दिल्या असल्या, तरी प्रत्यक्षात निकृष्ट धान्याचा पुरवठा थांबून नागरिकांना चांगल्या दर्जाचे धान्य मिळणार का, हा खरा प्रश्न आहे.

# पुणे जिल्ह्यात पीएम किसान योजनेतून १,९३७ कोटींचा लाभ

## ४.३४ लाख शेतकरी पात्र; २४ व्या हप्त्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरण

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना आतापर्यंत १ हजार ९३७ कोटी रुपयांचा लाभ वितरित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये सुमारे ४.३४ लाख शेतकरी सध्या या योजनेसाठी पात्र आहेत. दरम्यान, गुजरातमधील बनासकांठा येथे आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते योजनेच्या २४ व्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थिती लावली. यावेळी राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे, जिल्हाधिकारी श्री जितेंद्र डुडी, कृषी संचालक श्री उदय देशमुख, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे उपस्थित होते.शेतकऱ्यांना शेतीच्या खर्चासाठी आर्थिक आधार मिळावा, कृषी निविष्ठांची खरेदी करता यावी आणि शेती उत्पादन

वाढीस प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने केंद्र शासनामार्फत ही योजना राबविण्यात येते. योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबाला दरवर्षी सहा हजार रुपये तीन समान हप्त्यांत, प्रत्येकी दोन हजार रुपये याप्रमाणे थेट बँक खात्यात जमा केले जातात. २०१९ पासून पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना २३ हप्त्यांद्वारे निधी वितरित करण्यात आला असून, आता २४ व्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे.

**जिल्ह्यात ५.७६ लाख शेतकऱ्यांची नोंदणी :**

पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये या योजनेअंतर्गत एकूण ५ लाख ७६ हजार २७९ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. त्यापैकी पीएम किसान पोर्टलवर सद्यस्थितीत सुमारे ४.३४ लाख ३२७ लाभार्थी पात्र आहेत.

**लाभासाठी ई-केवायसी व आधार संलग्न खाते आवश्यक:**

योजनेचा लाभ नियमितपणे मिळण्यासाठी लाभार्थ्यांनी जमिनीच्या अभिलेखातील नोंदी अद्ययावत ठेवणे, ई-केवायसी पूर्ण करणे, बँक खाते आधारशी संलग्न करणे आणि आवश्यक शेतकरी ओळख क्रमांकाची पूर्तता करणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने निधी जमा केला जातो. महसूल, कृषी आणि ग्राम विकास विभागाच्या समन्वयातून योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांची संख्या आणि आजअखेर वितरित निधी :**

आंबेगाव तालुक्यात ३७ हजार २३१ लाभार्थी असून १५१ कोटी रुपये, बारामती ५० हजार ७३१ लाभार्थी व २३० कोटी रुपये, भोर २५ हजार १३७ लाभार्थी व १०४ कोटी रुपये, दौंड ४२ हजार ४२० लाभार्थी व १९५ कोटी रुपये, हवेली १० हजार ९५३ लाभार्थी व ५६ कोटी रुपये, इंदापूर ४८ हजार ७४० लाभार्थी व २१९ कोटी रुपये, जुन्नर ५२ हजार २८१ लाभार्थी व २३१ कोटी रुपये, खेड ४३ हजार ६३३ लाभार्थी व २०० कोटी रुपये, मावळ १७ हजार ४९६ लाभार्थी व ७७ कोटी रुपये, मुळशी १३ हजार ५५ लाभार्थी व ७१ कोटी रुपये, पुरंदर ३२ हजार १०८ लाभार्थी व १३३ कोटी रुपये, शिरूर ५१ हजार ५०८ लाभार्थी व २२९ कोटी रुपये, तर वेल्हा तालुक्यात ९ हजार ३४ लाभार्थी असून ४० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

# अमृत संस्थेमार्फत आयोजित अमृत दुर्गोत्सव २०२६ मध्ये सहभागी होण्याचे आवाहन

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्राचा दैदिप्यमान इतिहास आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा वारसा जपत नव्या पिढीमध्ये शिवविचारांची प्रेरणा जागवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत्त संस्थेतर्फे 'अमृत दुर्गोत्सव २०२६' चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. मागील वर्षाच्या अभूतपूर्व यशानंतर, यंदा पुन्हा एकदा या उपक्रमाची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये करण्यासाठी या ऐतिहासिक विक्रमाचा भाग होण्यासाठी समस्त पुणेकरांनी व शिवप्रेमीनी विक्रमी संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक सिद्धेश केसकर यांनी केले आहे. दिवाळीच्या काळात घरोघरी, शाळांमध्ये आणि सोसायट्यांमध्ये मातीचे किल्ले बनवण्याची आपली पारंपरिक संस्कृती जपून गड कोटांच्या संवर्धनाचा संदेश देणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ दरम्यान चालणाऱ्या या उत्सवात सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाला त्यांनी बनवलेल्या किल्ल्याच्या प्रतिकृतीचा फोटो www.amrutdurgotsav.com या अधिकृत पोर्टलवर अपलोड केल्यावर मा. मुख्यमंत्र्यांच्या सहीचे प्रमाणपत्र तात्काळ प्रदान केले जाणार आहे. सर्व नागरिकांना या मोहिमेत एकत्र आणून पुन्हा एकदा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी ऐतिहासिक नोंदणी नोंदवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या सांस्कृतिक चळवळीत प्रत्येकाने आपला खारीचा वाटा उचलून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## दखल

### दौंडमध्ये गुन्हेगारी वाढली; राष्ट्रवादी काँग्रेसचा पोलीस स्टेशनवर मोर्चा

**दौंड :** दौंड शहरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावणे, घरफोड्या, अवैध धंदे, गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून नागरिकांना मारहाण करण्याच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे दौंडमधील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या वाढत्या गुन्हेगारीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दौंड पोलीस स्टेशनवर धडक मोर्चा काढण्यात आला. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाला याबाबत जाहीर निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

शहरातील वाढते अवैध धंदे आणि गुन्हेगारी यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आक्रमक पवित्रा घेत पोलीस प्रशासनाला जागे करण्यासाठी हा धडक मोर्चा आयोजित केला होता. यावेळी माजी आमदार रमेश थोरात, जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्यासह स्थानिक नगरसेवक, नगरसेविका आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सुपूर्द केले. शहरातील कायदा-सुव्यवस्था सुधारण्यासाठी गुन्हेगारांवर आणि अवैध धंद्यांवर तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच, जर पोलिसांनी यावर तातडीने पावले उचलली नाहीत, तर पुणे पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### डॉ. प्रणाली चौधरी ठरली पुरंदर तालुक्यातील पहिली महिला एम डी डॉक्टर

**सासवड :** येथील वृत्तपत्र, नारळ व अन्य पुजा साहित्याची विक्री करणारे गणेश शरद चौधरी व सौ मनीषा गणेश चौधरी यांची कन्या डॉ प्रणाली चौधरी हिने वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय डॉक्टर ऑफ मेडिसिन (एमडी) पदवीका नुकतीच प्राप्त केली आहे. मुंबईच्या नायर रुग्णालयातील वैद्यकीय महाविद्यालयातुन तीने हे यश संपादन केले असुन पुरंदर तालुक्यातील पहिली महिला एम डी डॉक्टर होण्याचा बहुमानही डॉ प्रणालीने पटकावला आहे. सुरुवातीपासुनच अतिशय हुशार असलेल्या प्रणालीने सासवडच्या वाघीरे विद्यालयात आपले शालेय शिक्षणव पुण्याच्या नु म वि मध्ये माध्यमिक शिक्षण घेतले असुनअहिल्यानगरच्या विठ्ठलराव विखे पाटील वैद्यकीय महाविद्यालयातून एम बी बी एस पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे. सामान्य कुटुंबातील प्रणाली हिच्या आईवडिलांच्या मेहनतीचे हे फळ असुन तिच्या यशाचे सर्वं थरातुन अभिनंदन होत आहे. पुरंदर मेडिकल असोसिएशन, स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठान, सासवड शहर पत्रकार संघ, हॉटेल मोहिनी टी ग्रुप, सासवड व्यापारी संघटना यांसह अनेकांनी याबद्दल चौधरी कुटुंबाचे अभिनंदन केले आहे.

### आळेफाटा परिसरात गावठी कट्ट्यासह तरुण जेरबंद

**आळेफाटा :** आळेफाटा - संतवाडी(ता. जुन्नर )रस्त्यावर गावठी कट्टा बाळगून फिरणाऱ्या एका तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

ऋषिकेश गणेश पाडेकर (वय २६, रा. संतवाडी, ता. जुन्नर) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे.पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी अवैध शस्त्रांविरोधात कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हेचे पथक जुन्नर भागात गस्त घालत असताना, संतवाडी रोडवर एक इसम कमरेला कट्टा लावून उभा असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. पंचासमक्ष झडती घेतली असता कट्टा व काडतुसे मिळून आली.याप्रकरणी सहायक पोलीस उपनिरीक्षक दीपक साबळे यांनी आळेफाटा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पुढील तपास आळेफाटा पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल,अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, आळेफाटा पोलीस स्टेशनचे निरीक्षक विश्वास जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दीपक साबळे व पथकाने केली.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी आराखडा सादर

## दुष्काळ व पाणीटंचाईची शक्यता असलेल्या भागात जलसंधारण कामांना गती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** टंचाईग्रस्त व दुष्काळी भागातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी लघु पाटबंधारे विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती आणि उपलब्ध जलस्रोतांचा तांत्रिक अभ्यास करून केवळ तात्पुरती टँकर मुक्ती न करता गावांना शाश्वत जलसमृद्धीकडे घेऊन जाणारा आराखडा जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाकडून तयार करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील जलसंधारण प्रकल्प पाझर तलाव व बंधाऱ्यांची दुरुस्ती करून उपलब्ध पाणीसाठा आणि सिंचनक क्षमता पुनर स्थापित करण्याच्या उद्देशाने दुष्काळ व पाणीटंचाईची शक्यता असलेल्या भागात जलसंधारण कामांना गती देण्यात आली असून दुष्काळ निवारण आराखडा वेळेत आणि गुणवत्तेसह पूर्ण करण्यासाठी लोकसहभाग अत्यंत आवश्यक आहे.

पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे आणि भूजल पातळीत वाढ करणे, विकेंद्रीत जलसाठे निर्माण करून ग्रामीण भागातील शेतीसाठी संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करणे व टंचाईग्रस्त आणि पाण्याच्या अतिवापरामुळे भूजल पातळी खालावलेल्या गावांना टँकरमुक्त व जलसमृद्ध करण्याच्या उद्देशाने प्रकल्पांची दुरुस्ती करण्यात येणार आहे.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत धरणे व जलसाठ्यांमधील गाळ काढून साठवण क्षमता वाढविणे आणि काढलेला गाळ शेतात पसरवून जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी मदत होते. या अभियानांतर्गत पात्र शेतकऱ्यांना गाळ वाहतुकीसाठी प्रति घनमीटर रुपये ३४.७५ प्रमाणे अनुदान देण्यात येते. एका एकरासाठी कमाल १५ हजार रुपये व दोन एकरासाठी कमाल ३० हजार ५०० रुपये पर्यंत मदत देण्यात येते. या अभियानांतर्गत २११ कामे प्रस्तावित आहेत.

या अभियानांतर्गत अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, विधवा, दिव्यांग व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पात्र लाभार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. जलसाठ्याची माहिती, गाळाचे प्रमाण, शेतकरी व कामाची माहिती तसेच कामापूर्वी आणि कामानंतरचे छायाचित्र, व्हिडिओ अवनी ॲपवर नोंदविणे आवश्यक आहे.

एलनिनोच्या पार्श्वभूमी वरती ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जलसाठ्यांमधील असलेल्या पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात पाझर तलाव, वळण बंधारे गाव तलाव, साठवन बंधारे यांचे दुरुस्तीची कामं हाती घेण्यासाठी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाने आराखडा करून जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावित करण्यात आलेला आहे. ही कामे वेळेत मंजूर होऊन दुरुस्त झाल्यास पुढील येणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब अडवणे व तो जमिनीत जिरवणे शक्य होईल व पाण्याचे नियोजन योग्य पद्धतीने करता येईल, असे जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गौरव बोरकर यांनी सांगितले

### पिसर्वे येथील युवकाचा टेम्पोच्या अपघातात मृत्यू

**नितीन यादव । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** भरधाव ४०७ टेम्पोने दुचाकीला मागून धडक दिल्याने एका २५ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे. बुधवारी २८ ऑक्टोबर रोजी सकाळी सासवड कोंढवा रस्त्यावर भिवरी बोपगाव दरम्यान ९९बेकरी नजीक हा अपघात झाला. गिरीश गोरख कोलते राहणार पिसर्वे असे मृत तरुणाचे नाव आहे. बाळासाहेब र कोलते यांनी याबाबत सासवड पोलिसांना फिर्याद दिली आहे.

या घटनेचे वृत्त.. गिरीश कोलते हा आपल्या पल्सर दुचाकीवरून (क्र एम एच १२ झेड झेड ३५८६) हिंजेवाडी येथे कामासाठी निघाला होता. सकाळी नऊच्या सुमारास बोपगाव भिवरी दरम्यान ९९ नावच्या बेकरीजवळ मागून येणाऱ्या ४०७ टेम्पो (क्र. एम एच ०२ ई आर २०३२) ने त्याला जोराची धडक दिली त्यात गिरीश जागीच मृत्यू पावला. विशेष म्हणजे टेम्पो चालक न थांबता पळून गेला आहे. सासवड पोलीसस्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जाधवर अधिक तपास करत आहेत

**पिसर्वेवर शोककळा...**

मृत गिरीश याच्या मागे पत्नी, एक छोटी मुलगी, आई व बहीण असा परिवार असुन त्याच्या वडिलांचे काही वर्षांपूर्वी निधन झाले आहे. एकुलत्या एक मुलाच्या अपघाती मृत्यूने पिसर्वे गावावर शोककळा पसरली आहे.पिसर्वे येथे दुपारी तीन वाजता शोकाकुल वातावरणात गिरीश याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले

# रेशनिंगच्या धान्यात मातीचे खडे; दौंड तालुक्यात पुरवठा विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दौंड :** शासनाकडून रेशन दुकानांमार्फत गरिबांना वितरीत केल्या जाणाऱ्या धान्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मातीचे खडे आणि कचरा आढळल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दौंड तालुक्यातील रेशनिंग धान्याच्या या निकृष्ट दर्जामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र संताप उसळला असून, थेट पुरवठा विभागाच्या पारदर्शकतेवर आणि कारभारावर नागरिकांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

**गरिबांच्या आरोग्याशी खेळ**

शासनाच्या अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत तालुक्यातील हजारो गरीब कुटुंबांना दरमहा रेशन दुकानातून गहू आणि तांदळाचे वाटप केले जाते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून वितरीत करण्यात आलेल्या धान्यात धान्यापेक्षा मातीचे खडे

आणि खडीचे प्रमाण जास्त असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. हे धान्य निवडून खाण्यापलीकडे गेल्याने अनेक कुटुंबांना बाजारातून महागडे धान्य विकत घ्यावे लागत आहे. हक्काचे धान्य असूनही प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे गरिबांना उपाशी राहण्याची किंवा आरोग्याला धोका निर्माण करणारे अन्न खाण्याची वेळ आली आहे.

**गोदामातूनच पुरवठा की दुकानदारांची मनमानी?**

रेशन दुकानदारांकडे याविषयी विचारणा केली असता, आम्हाला शासकीय गोदामातून ज्या दर्जाचे धान्य मिळते, तेच आम्ही वितरीत करतो, असे उत्तर त्यांच्याकडून मिळत आहे. त्यामुळे हा भेसळीचा प्रकार थेट शासकीय गोदामातून किंवा वाहतूक करणाऱ्या कंत्राटदारांकडून तर होत नाही ना? असा संशय आता बळावला आहे. धान्याची गोदामात साठवणूक करताना आणि ते दुकानांपर्यंत पोहोचवताना पुरवठा विभागाचे यावर नियंत्रण का नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया**

आम्ही गरीब लोक रेशनच्या धान्यावर अवलंबून असतो. मात्र, यावेळी मिळालेल्या गव्हात आणि तांदळात इतके खडे आहेत की ते खाण्यालायक नाही. पुरवठा विभागाने स्वतः हे धान्य तपासून पाहावे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली आहे.

**कारवाईची मागणी**

तालुक्यातील रेशनिंग व्यवस्थेतील हा सावळागोंधळ थांबवून धान्याची गुणवत्ता तपासली जावी, दोषी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कडक कारवाई व्हावी, अशी मागणी गणेश जगताप, सदस्य, अखिल भारतीय ग्राहक पंचायत दौंड तालुका यांनी केली आहे.

पुरवठा विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# एचडीएफसी लाईफच्या 'स्वाभिमान' उपक्रमातून पुण्यात सामाजिक व पर्यावरणीय विकासाला चालना

- पुणे सेंट्रलसह शहरात 'सिटी फॉरेस्ट्स'द्वारे हरित क्षेत्राचा विस्तार
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्याच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना पूरक उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात पर्यावरण संवर्धन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासाला प्राधान्य दिले जात असताना, एचडीएफसी लाईफच्या 'स्वाभिमान' या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमातून पुण्यासह राज्यात विविध विकासात्मक उपक्रम राबविण्यात येत आहेत. कंपनीने गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात २०.७३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून, ४८ प्रकल्पांच्या माध्यमातून ३ लाख ४१ हजार १८० हून अधिक नागरिकांपर्यंत लाभ पोहोचविला आहे. पुण्यातील शहरी हरित क्षेत्राचा विस्तार, शिक्षण आणि समुदाय विकासावर या उपक्रमांतर्गत विशेष भर देण्यात आला आहे.

**पुणे सेंट्रलसह शहरी हरित क्षेत्राच्या विस्ताराला चालना :**

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने एचडीएफसी लाईफच्या 'सिटी फॉरेस्ट्स' उपक्रमातून पुण्यासह मुंबई, वसई-विरार, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे २५ शहरी वने आणि दोन घनदाट वने विकसित करण्यात आली आहेत. या माध्यमातून १०.४० लाख चौरस फुटांहून अधिक क्षेत्रावर ९८ हजार ३८० स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे. शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि नागरिकांना पर्यावरणपूरक परिसर उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पुणे सेंट्रलसह शहरातील हरित विकासाच्या प्रयत्नांना अशा उपक्रमांमुळे बळ मिळत आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासदृष्टीला पूरक योगदान:**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या विकासात पर्यावरणीय शाश्वतता, आधुनिक पायाभूत सुविधा, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांना महत्त्व दिले आहे. शासनाच्या विकासाभिमुख धोरणांना पूरक ठरणाऱ्या खासगी क्षेत्रातील सामाजिक उत्तरदायित्वाच्या उपक्रमांमधूनही स्थानिक पातळीवर सकारात्मक बदल घडविण्याची संधी निर्माण होत आहे. एचडीएफसी लाईफच्या 'स्वाभिमान' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासोबतच शिक्षण, कौशल्यविकास, आरोग्य आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**शिक्षण व उपजीविकेसाठी ७.८१ कोटींची गुंतवणूक :**

शिक्षण आणि उपजीविका क्षेत्रात महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत २० कार्यक्रम राबविण्यात आले असून, त्यासाठी ७.८१ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या उपक्रमांचा ४३ हजार ९४० हून अधिक नागरिकांना लाभ झाला आहे. पुणे, बारामती आणि इंदापूरसह मुंबई, लातूर, पालघर आणि नाशिक येथे अंगणवाडी व्यवस्था सुधारणे, शालेय पायाभूत सुविधा बळकट करणे, डिजिटल शिक्षण, विशेष गरजा असलेल्या मुलांना सहाय्य आणि आर्थिक साक्षरता वाढविण्याचे उपक्रम राबविण्यात आले आहेत. शेतकऱ्यांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करण्यावरही भर देण्यात आला आहे.

**आरोग्य व स्वच्छतेसाठी ६.४९ कोटींचा खर्च:**

आरोग्यसेवा आणि स्वच्छता क्षेत्रात गेल्या तीन वर्षांत १७ कार्यक्रम राबविण्यात आले असून, त्यासाठी ६.४९ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पालघर येथील २ लाख ६४ हजारांहून अधिक नागरिकांना त्याचा लाभ झाला आहे. गरजू रुग्णांना आरोग्यसेवा, गंभीर आजारांनी ग्रस्त मुलांच्या शस्त्रक्रियांना सहाय्य, माता व बाल आरोग्य आणि आरोग्यविषयक जनजागृतीवर भर देण्यात आला आहे. तसेच १,१०० घरगुती शौचालयांच्या उभारणीस सहाय्य करण्यात आले आहे.

**पर्यावरणीय उपक्रमांसाठी ६.४३ कोटी :**

पर्यावरण संवर्धनासाठी महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत ६.४३ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या अंतर्गत ११ कार्यक्रमांच्या माध्यमातून ३२ हजार ८०० हून अधिक नागरिकांपर्यंत लाभ पोहोचला आहे. मुंबई, ठाणे, नांदेड आणि चिपळूण येथील १० शाळांमध्ये २३०.४४ किलोवॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले असून, त्याचा १,४०० हून अधिक विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे. नागपूरजवळील साकोली येथील सेंदूरवाफा तलावाच्या पुनरुज्जीवनासाठीही सहाय्य करण्यात आले आहे.

'स्वाभिमान' उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, शैक्षणिक विकास, आरोग्य सुविधा आणि रोजगाराभिमुख उपजीविकेच्या संधी यांची सांगड घालून महाराष्ट्रात शाश्वत सामाजिक विकासाला हातभार लावण्याचा एचडीएफसी लाईफचा प्रयत्न आहे.

द•ख•ल

## सद्गुरु बाळूमामा पालखी व भाग्यशाली मेंढरांना भावपूर्ण निरोप सोहळा

**शेवगाव :** गेली चार दिवस समर्थ सद्गुरु श्री बाळूमामांची पवित्र पालखी व भाग्यशाली मेंढरांचा मुक्काम पुण्यभूमी आखेगाव येथे होता. या पवित्र मुक्कामाच्या सांगता निमित्ताने पालखी व मेंढरांना भावपूर्ण निरोप देण्यात आला हभप. श्री गुरुवर्य राम महाराज झिंजुर्के यांच्या प्रेरणेने व आखेगावच्या श्री संत जोग महाराज संस्कार केंद्राच्या वतीने यावेळी ग्रामस्थ,महिला माता-भगिनींच्या सहभागातून पुरणपोळीचा नैवेद्य व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यानिमिताने सायंकाळी ६ ला गुरुवर्य राम महाराज झिंजुर्के यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी पुरणपोळीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. त्या साठी आखेगावातील प्रत्येक घरा घरातील माता-भगिनींनी. या सेवाकार्यात हिरीरीने सहभाग घेतला .संतसेवा हीच ईश्वरसेवा! या उक्तीनुसार व मॅनेजमेंट गुरु हभप राम महाराज यांचा सांगावा म्हणून ' बाळूमामांच्या नावानं चांगभलं ' च्या गजरात हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

## ई-पीक पाहणीचा वेग मंदावला!

**श्रीगोंदा :** पीकविमा आणि नैसर्गिक आपत्तीतील शासकीय नुकसानभरपाई मिळवण्यासाठी महत्त्वाची असलेली ई-पीक पाहणी नोंदणी श्रीगोंदा तालुक्यात अद्याप १०० टक्क्यांवर पोहोचलेली नाही. सप्टेंबरपासून सुरू असलेल्या या मोहिमेत आतापर्यंत ६५ टक्के नोंदणी पूर्ण झाली असून, तब्बल ३५ टक्के पीक पाहणी बाकी आहे. १५ नोव्हेंबर ही अंतिम मुदत असल्याने उर्वरित नोंदणी पूर्ण करण्याचे आव्हान महसूल यंत्रणेसमोर उभे राहिले आहे. या कामासाठी प्रशासनाने तालुक्यात तब्बल २१३ नोंदणी सहाय्यकांची नियुक्ती केली आहे. प्रत्येक शेतकऱ्याच्या पीक नोंदणीमागे सहाय्यकाला १० रुपये मानधन दिले जाते. शासनाकडून या सहाय्यकांचे पेमेंटही करण्यात आले आहे. शेतकऱ्यांकडून पीक पाहणी नोंदणीसाठी पैसे मागितल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे तहसीलदार सचिन डोंगरे यांनी स्पष्ट केले. ई-पीक पाहणी ही केवळ सरकारी ऑनलाइन प्रक्रिया नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेशी जोडलेली बाब आहे. शेतात कोणते पीक घेतले आहे, याची अधिकृत नोंद झालेली नसेल तर पीकविमा आणि नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई मिळवताना अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी केवळ मुदतीची वाट न पाहता आपल्या शेताची पीक पाहणी झाली आहे की नाही, याची खात्री करणे गरजेचे आहे. २१३ सहाय्यकांची नियुक्ती, शासनाकडून मानधनाचे पेमेंट आणि सप्टेंबरपासून सुरू असलेली प्रक्रिया, असे चित्र असतानाही ३५ टक्के नोंदणी बाकी आहे. आता उर्वरित दिवसांत महसूल यंत्रणा किती वेगाने काम करते आणि शेतकऱ्यांची पीक नोंदणी वेळेत पूर्ण होते का, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.तहसीलदार सचिन डोंगरे यांनी शेतकऱ्यांना १५ नोव्हेंबरपूर्वी ई-पीक पाहणी पूर्ण करून घेण्याचे आवाहन केले आहे.

## रामेश्वरदास विद्यालयात आकाशकंदील शाळा संपन्न

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहीगाव - ने संचालित हातगाव येथील श्री रामेश्वरदास विद्यालय येथे सालाबादप्रमाणे या ही वर्षी दिवाळी सणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतून आकाश कंदील बनवण्याचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला असल्याबाबतची विद्यालयाचे मुख्याध्यापक आयुब सय्यद यांनी दिली आहे. या बाबत माहिती देताना त्यांनी सांगितले आहे की,विद्यालयातील सर्वच विद्यार्थांनी आपला सहभाग नोंदवला असून विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या संकल्पनेतून सदरचा कार्यक्रम पार पडला आहे. या कार्यक्रमाचे कौतुक शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील यांचेसह व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून या कामी मुख्याध्यापक आयुब सय्यद यांचेसह शिक्षक गोरक्ष सातपुते, बाळासाहेब कोकरे, सतिष सुपारे, राहुल ज्योतीक,वैद्य धनजय, अशोक पवार, सुनिल म्हस्के, अक्षय मरकड, अमर देशमुख, तेजस घुले,श्रीमती सुनिता पगारे,लिपिक राजु मिसाळ, बापू वाघमारे यांनी या कामी प्रोत्साहन दिले होते.

## मला झाड व्हायचं मधून ग्रामीण कष्टक यांची सुख-दुखाची मांडणी : विजय लोंढे

**पारनेर :** कवी अशोक गायकवाड यांनी मला झाड व्हायचं पुस्तकातून खेड्यापाड्यातील काबाडकष्ट करणाऱ्या श्रमिकांची सुख-दुःख मांडले असे प्रतिपादन पुणे येथील प्रसिद्ध साहित्यिक विजय लोंढे यांनी केले. ते पानोली (ता. पारनेर) येथे झालेल्या पुस्तक प्रकाशन समारंभ प्रसंगी बोलत होते. युवा कवी अशोक गायकवाड यांच्या 'मला झाड व्हायचंय' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच पानोली येथे संपन्न झाला. यावेळी लोंढे हे अध्यक्षीय भाषणात बोलत होते. याप्रसंगी मंचावर साहित्यिक स्वाती ठुबे, समीक्षक प्रशांत वाघ, कवी संदीप राठोड, पारनेर साहित्य साधना मंचचे संस्थापक कारभारी बाबर उपस्थित होते. नवकवींच्या लेखणीला बळ देण्यासाठी पारनेर साहित्य साधना मंच द्वारे साहित्यिक मार्गदर्शन व नवोदितांची पुस्तके प्रकाशित करण्यात येतात. गायकवाड यांच्या कवितासंग्रहाचे मंच द्वारे प्रकाशन करण्यात आले. यावेळी लेखक अशोक आगळे, कवी सोमनाथ चौधरी, गणेश भोसले, साहेबराव घुले, डॉ. बाळासाहेब शिंगोटे, महाबली मिसाळ, विजय रोहोकले, प्रा. संकेत ठाणगे, एकनाथ औटी, सतिश शेटे, उमेश गोरे, कानिफनाथ गायकवाड, कवयित्री सुजाता रासकर, सुप्रिया मंडलिक, सुप्रभा पुजारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकाशक संजय पठाडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. तुषार ठुबे यांनी सूत्रसंचालन केले तर सामाजिक कार्यकर्ते संतोष खोडदे यांनी आभार मानले.

# दुष्काळाने पाणी आटले बिबट्या वस्तीत घुसला !

### जेऊरच्या डोणी परिसरात कुत्र्याची शिकार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील जेऊर येथील डोणी परिसरात बिबट्याने अनिकेत तोडमल यांच्या घरासमोर बसलेल्या कुत्र्याची शिकार केल्याची घटना घडली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

जेऊर, बहिरवाडी, धनगरवाडी, इमामपूर आणि ससेवाडी परिसरातील डोंगररांगांमध्ये बिबट्याचे वास्तव्य वारंवार निदर्शनास आले आहे. यापूर्वीही या भागात

बिबट्याकडून अनेक पशुधनांची शिकार करण्यात आली आहे. डोणी शिवारात घरासमोर बसलेल्या कुत्र्याची शिकार झाल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे.

दुष्काळाची तीव्रता वाढल्याने डोंगररांगांमधील नैसर्गिक जलस्रोत आटले आहेत. त्यामुळे पाणी आणि भक्ष्याच्या शोधात वन्यप्राणी मानवी वस्त्यांकडे धाव घेत असल्याचे दिसून येते. घटनेची माहिती मिळताच वनकर्मचारी संजय सरोदे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. वनविभागाच्या वतीने परिसरात पिंजरा लावण्यात आला आहे. बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून भविष्यात अनुचित प्रकार घडू नये यासाठी वनविभागाने तातडीने आवश्यक उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## सोनाली मात्रे यांचा शेवगाव बार कौन्सिलतर्फे सन्मान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** पाथर्डी उपविभागात प्रशिक्षणार्थी उपविभागीय अधिकारी म्हणून रुजू झालेल्या सोनाली अर्जुनराव मात्रे या आज न्यायालयीन प्रकरणाच्या सुनावणीसाठी शेवगाव तहसील कार्यालयात आल्या असता, शेवगाव बार कौन्सिलच्या वतीने त्यांचा सन्मान व सत्कार करून पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

सोनाली मात्रे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) राज्यसेवा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जून २०२३ मध्ये जाहीर झालेल्या राज्यसेवा २०२१ परीक्षेच्या अंतिम निकालात त्यांनी खुल्या गुणवत्ता यादीत राज्यातून तृतीय क्रमांक, तर महिला उमेदवारांमधून प्रथम क्रमांक पटकावला होता. यावेळी शेवगाव बार कौन्सिलच्या वतीने ॲड. कारभारी गलांडे, ॲड. संजय सानप, ॲड. मुनाफ शेख, ॲड. सुहास चव्हाण, ॲड. अविनाश शिंदे, ॲड. अभिषेक विखे, ॲड. किरण तौतिक, ॲड. ज्ञानेश्वर गाडेकर, ॲड. संकेत तांबे, ॲड. अर्जुन लोखंडे आणि ॲड. लक्ष्मण मडके उपस्थित होते.यावेळी उपस्थित वकिलांनी सोनाली मात्रे यांचे अभिनंदन करून पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देताना कायद्याच्या चौकटीत राहून पारदर्शक, लोकाभिमुख आणि गतिमान प्रशासनाची अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

## दुष्काळाच्या झळांनी तमाशाची कला कोलमडली

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या तमाशा कलेवर सध्या जाणवत असलेल्या दुष्काळमुळे तसेच वाढता खर्च आणि बदलत्या मनोरंजनाच्या माध्यमांमुळे संकटाचे सावट निर्माण झाले आहे. ग्रामीण व शहरी भागातील रसिकांचे मनोरंजन करणारी ही पारंपरिक लोककला टिकवून ठेवताना तमाशा फडमालकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. एका बाजूला दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक व्यवहारांवर परिणाम होत असताना दुसऱ्या बाजूला वाहतूक, इंधन आणि इतर खर्चाचा भार वाढत आहे. त्यामुळे तमाशा मंडळांना शासनाच्या मदतीची प्रतीक्षा आहे.महाराष्ट्रातील तमाशाला समृद्ध परंपरा लाभली आहे. गण, गवळण, लावणी आणि वगनाट्य अशा विविध कलाप्रकारांनी तमाशाने अनेक दशके रसिकांचे मनोरंजन केले. मात्र, काळानुसार मनोरंजनाची साधने बदलली असून चित्रपट आणि मोबाईलच्या माध्यमातून सहज उपलब्ध होणाऱ्या दृश्यांचा प्रभाव तमाशावरही पडत आहे. प्रेक्षकांच्या बदलत्या अपेक्षांमुळे पारंपरिक सादरीकरणात बदल करावे लागत आहेत. त्यामुळे जुन्या काळातील पारंपरिक तमाशा ज्या पद्धतीने सादर केला जात होता, तसा आज सादर करणे कठीण होत असल्याची खंत आनंद लोकनाट्य तमाशाचे मालक मयूर महाजन यांनी व्यक्त केली.शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील श्री साध्वी बन्नोमा यात्रेनिमित्त तमाशाचा फड दाखल झाल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

ते म्हणाले की, आमच्या आनंद लोकनाट्य तमाशा फडाला शंभर वर्षांची परंपरा पूर्ण झाली आहे. या काळात अनेक नामवंत कलावंतांनी आमच्या मंडळात काम केले आहे. पूर्वी तमाशात शंभराहून अधिक कलावंत कार्यरत असत. सध्या एका तमाशा फडात साधारणतः ७० ते ८० जण काम करतात. या कलावंतांचा उदरनिर्वाह पूर्णपणे तमाशातील कामावर अवलंबून आहे. अनेकांकडे उत्पन्नाचे दुसरे साधन किंवा कौटुंबिक मालमत्ता नसल्याने तमाशाचा फड बंद पडणे म्हणजे त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणे होय.आजच्या परिस्थितीत तमाशा चालविणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसतानाही कलावंतांच्या पोटापाण्याचा विचार करून फड सुरू ठेवावे लागत आहेत. तमाशा हा केवळ मनोरंजनाचा व्यवसाय नसून शेकडो कलावंतांच्या उपजीविकेचे साधन आहे. त्यामुळे या कलेच्या संवर्धनाबरोबरच त्यावर अवलंबून असलेल्या कलावंतांना आर्थिक आधार देणे आवश्यक असल्याचे महाजन यांनी सांगितले. तमाशा मंडळांना आर्थिक भारातून दिलासा मिळावा, यासाठी राज्य शासनाकडे सातत्याने विविध मागण्या करण्यात येत आहेत. तमाशा वाहनांना टोलमाफी द्यावी, कार्यक्रमांच्या ठिकाणी मोफत पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे आणि डिझेलवरील करात कपात करून इंधनाच्या खर्चात सवलत द्यावी, या मागण्या पूर्ण झाल्यास तमाशा मंडळांच्या खर्चात काही प्रमाणात बचत होऊन आर्थिक संकटाची तीव्रता कमी होऊ शकते. लोककला टिकविण्यासाठी शासनाचा आधार आवश्यक तमाशा ही केवळ करमणुकीची कला नसून महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचा आणि लोकपरंपरेचा महत्त्वाचा वारसा आहे.

## पाणी अर्ज घेण्याची गरज

**निघोज :** साडे सतरा हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली असून कुकडी डावा कालव्याचे पाणी फक्त पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिड दिवस मिळत आहे ही नामुष्की टाळण्यासाठी पाणी वापर संस्था सक्षम होण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे. गेली चाळीस वर्षांपासून निघोज सहीत जवळपास सतरा ते अठरा गावांना कुकडी डावा कालवा व कुकडी नदीच्या पाण्याचा फायदा होत आहे. मात्र पन्नास पेक्षा जास्त पाणी वापर संस्था तालुक्यात असून फक्त साडेतीन हजार हेक्टर शेतीसाठी पाण्याची मागणी होत असून यावर्षी संपूर्ण राज्यात भिषण दुष्काळी परिस्थिती असून आणी राज्य सरकारचे पाण्यावर कडक निर्बंध असूनही हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढ्याच संस्था कार्यक्षमपणे काम करीत असून पाण्याची मागणी वाढली पाहिजे किमान तीप्पट म्हणजे साडे सतरा हजार हेक्टर मध्ये साडे दहा हेक्टर पाण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली तरच किमान पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना आठ दिवस पाणी मिळेल अन्यथा पाणी पाटपाण्याने पोलिस बंदोबस्तात जात आहे आपण मात्र फक्त बघत राहू अशीच परिस्थिती निर्माण होणार आहे.

## पाण्यासाठी महिला आक्रमक ; प्रशासनाच्या ढिसाळ कारभार विरोधात आंदोलनाचा इशारा !

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील चिंचोली रमजान येथील स्थानिक प्रशासनाच्या ढिसाळ आणि नियोजन शून्य कारभारामुळे येथील भिल्ल समाज बांधवांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने पिण्याच्या पाण्याकरिता येथील महिलांना मैलदूर दूर भटकंती करावी लागत आहे.

या ठिकाणी ग्रामपंचायतीचे पाणीपुरवठा योजनेचे पाणीपुरवठा सुविधा असताना पाणी मिळत नसल्याने या संतप्त महिलांनी आपल्या तक्रार करत तीव्र नाराजी व्यक्त करुन ग्रामपंचायत कार्यालयावर रिकामे हांडे घेऊन हंडा मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.

चिंचोली रमजान गावातील गावठाण व वस्तीवरील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा म्हणून येथील ग्रामपंचायत कार्यालया पासुनच जवळ काही अंतरावर असलेल्या विहिरीतून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, विहिरीत काही प्रमाणात पाणी असताना देखील स्थानिक प्रशासनाच्या नियोजन अभावी येथील भिल्ल समाज बांधवांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. पंधरा दिवस ते महिन्यातून एक वेळेस पाणी सुटते, मात्र पाणीपुरवठा बाबत कुठलेही नियोजन नाही. व पुरेसे पाणी मिळत नसल्याचे तक्रार येथील महिला भगिनींनी कडुन करण्यात आली आहे.

गावासाठी लाखो रुपये खर्च करून राज्य शासनाने जलजीवन ही शासनाची पाणी पुरवठा योजना राबविली आहे. मात्र, ही योजना अर्धवट राहिल्याने त्याचा गावाकरिता काही उपयोग झालेला नाही. उलट शासनाच्या लाखो रुपयांची गुंतवणूक होऊन देखील योजना गावासाठी असुनही नसल्यागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्य ऐन दुष्काळजन्य परिस्थितीत या भागातील महिलांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. दुष्काळी परिस्थितीचे आणखीन बरेच दिवस असून आताच पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने पाण्याचे टँकर तात्काळ सुरू करावेत, तालुका प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिलीप नन्नवरे, मंगल गायकवाड, जनाबाई फसले, संदीप घोडे, संदीप आयकर, अंबादास भुजबळ, तुकाराम भुजबळ, संपत भुजबळ, दशरथ फसले, पंढरीनाथ गायकवाड यांच्यासह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्मार्ट मीटर सक्तीविरोधात राशीन ग्रामपंचायतीसमोर आमरण उपोषण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** गावातील स्मार्ट मीटर सक्तीच्या मुद्द्यावरून महावितरण प्रशासनाविरोधात ग्रामस्थांचा संताप दिवसेंदिवस वाढत असून, ग्रामपंचायत कार्यालयासमोर बहुजन समाज पार्टीचे अहिल्यानगर जिल्हा प्रभारी दत्तात्रय आत्माराम सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. मात्र, उपोषण सुरू होऊनही कर्जत येथील महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन उपोषणकर्त्यांची भूमिका जाणून घेत लेखी आश्वासन दिले नसल्याने उपोषण सुरूच आहे.

दरम्यान, राशीन येथील महावितरणचे अधिकारी जाधव यांनी उपोषणस्थळी येऊन चर्चा केली. मात्र, उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांवर ठोस लेखी आश्वासन मिळाले नसल्याने आंदोलन मागे घेण्यास उपोषणकर्त्यांनी नकार दिला आहे. केवळ तोंडी चर्चा करून प्रश्न सुटणार नाहीत, तर प्रशासनाने अधिकृत लेखी भूमिका मांडून ग्रामस्थांच्या तक्रारींचे निराकरण करावे, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.

राशीन ग्रामसभेचा ठराव क्रमांक २४/०४, दिनांक २७ जानेवारी २०२६ नुसार स्मार्ट मीटर संदर्भात संबंधित महावितरण अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र, या ठरावाची अंमलबजावणी अद्याप का झाली नाही, याबाबत प्रशासनाने लेखी खुलासा द्यावा, असा सवाल उपोषणकर्त्यांनी उपस्थित केला आहे. ग्रामसभा ठराव क्रमांक २४/०४, दिनांक २७ जानेवारी २०२६ नुसार संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी. नवीन वीजजोडणी घेणाऱ्या ग्रामस्थांवर स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती केली जात असल्यास, त्यासंबंधीचे नियम व अधिकृत आदेश ग्रामस्थांसमोर स्पष्ट करावेत. राशीन गावात यापूर्वी बसविण्यात आलेल्या स्मार्ट मीटरबाबत ग्रामसभेच्या ठरावानुसार निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल ग्रामपंचायतीला द्यावा. स्मार्ट मीटरबाबत ग्रामस्थांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी ग्रामपंचायत, महावितरण अधिकारी आणि ग्रामस्थांची संयुक्त बैठक आयोजित करावी.

# दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा; १२ नोव्हेंबरपर्यंत वीजपुरवठ्याची अट शिथिल!

### आ. पाचपुते यांच्या नेतृत्वाखाली माऊली निवास येथे तिसरी आढावा बैठक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** दुष्काळी परिस्थितीत पशुधन वाचविण्यासाठी चारा उपलब्ध करून देण्याबाबत सरकार आग्रही असून, शेतकऱ्यांनी चाऱ्याची मागणी नोंदवावी. मक्याचे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच १२ नोव्हेंबरपर्यंत वीजपुरवठ्याबाबतची अट शिथिल करण्यात आली असून, सर्व भागांतील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पाणी उपसा सुरू ठेवण्यास परवानगी असली तरी शेतकऱ्यांनी कमी उपसा करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन आमदार विक्रम पाचपुते यांनी केले.

आमदार विक्रम पाचपुते यांच्या नेतृत्वाखाली माऊली निवास येथे दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तिसरी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शेतीसाठी पाणी, पशुधनासाठी चारा, वीजपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आरक्षित पाणी मोकळे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कुकडी आणि घोड कालव्याचे आवर्तन शेतीसाठी असल्याने शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. पाणी उपसा

सुरू ठेवण्यात येणार असला तरी पाण्याचा अनावश्यक वापर टाळून कमी उपसा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पाणी वापर संस्थांनीही उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करावे, असे सांगण्यात आले.

दरम्यान, काही भागांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून विशेष नियोजन केले जाणार आहे. पशुधन वाचविण्यासाठी चारा

**बातमीतील ठळक मुद्दे :**
- १२ नोव्हेंबरपर्यंत वीजपुरवठ्याची अट शिथिल.
- पाणी उपसा सुरू; मात्र कमी उपसा करण्याचे आवाहन.
- कुकडी व घोडचे आवर्तन शेतीसाठी.
- पशुधनासाठी चारा उपलब्ध करण्यावर शासनाचा भर.
- चारा उत्पादनासाठी मक्याचे बियाणे उपलब्ध.
- काही भागांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू.

उपलब्ध करून देण्याबाबत शासन सकारात्मक असून, शेतकऱ्यांनी चाऱ्याची मागणी प्रशासनाकडे नोंदवावी. चारा उत्पादनासाठी मक्याचे बियाणेही उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पालकमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्याकडून सकारात्मक आश्वासन मिळाले असून, पाटबंधारे विभाग आणि तहसीलदार यांचेही मोलाचे सहकार्य मिळत असल्याचे आमदार पाचपुते यांनी स्पष्ट केले. दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि पशुधनाला दिलासा देतानाच पिण्याच्या पाण्याचे नियोजन बिघडणार नाही, यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे प्रयत्न सुरू राहणार आहेत.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शनिवार, दि.३१ ऑक्टोबर २०२६ | पान ८

## घरासमोरील शेडमधून २० गोणी कांदा लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील पिंपरी अवघड येथे घरासमोरील शेडमध्ये साठवून ठेवलेल्या कांद्याच्या २० गोण्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या चोरीत शेतकऱ्याचे अंदाजे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विजय शिवाजी लांबे, वय ४८ वर्षे, रा. पिंपरी अवघड, ता. राहुरी, यांची पिंपरी अवघड शिवारात शेती आहे. त्यांनी सुमारे चार महिन्यांपूर्वी कांदा काढणी करून कांद्याच्या गोण्या घरासमोरील शेडमध्ये साठवून ठेवल्या होत्या. दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी दिवसभरात त्यांनी कांद्याच्या २० गोण्या भरून शेडमध्ये ठेवल्या होत्या.

रात्री १० वाजण्याच्या सुमारास जेवण करून कुटुंबीय झोपी गेले. दुसऱ्या दिवशी म्हणजेच २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता उठल्यानंतर शेडमध्ये पाहणी केली असता कांद्याच्या गोण्या गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

# बागाईत जमिनीला जिराईतीचा भाव...

### संतप्त शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईची रक्कम नाकारली | सूरत-चेन्नई महामार्गाचे भूसंपादन; प्रांतांना दिले निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बागाईती शेतजमीन जिथे ५० लाख रुपये एकर सुरू आहे, तिथे रेडी रेकनरचा नियम दाखवत केंद्र सरकारने २३ लाख रुपये एकर जमिनीला नुकसानभरपाई दिली. बागाईती शेतजमिनीला जिराईतीचा दर द्यायला हे सरकार निघाले, शिवाय जमीन व सेटची रक्कम एकत्र देणे आवश्यक असताना ''आधी फक्त जमिनीचे पैसे घ्या, नंतर सेटची देऊ,'' अशी शेतकऱ्यांना लुटायला निघालेली शासनाची भूमिका असेल, तर ''शेतकरी ते सहन करणार नाही, शेतकऱ्याच्या घरादारावर नांगर फिरवून हायवे होणार असेल, तर हा विकास काय कामाचा?'' असा संतप्त सवाल करत सोनगावसह पाच गावांच्या शेतकऱ्यांनी भूसंपादनाची रक्कम नाकारली.

श्रीरामपूर : प्रांताधिकारी किरण सावंत यांना निवेदन देताना सूरत-चेन्नई संघर्ष समितीचे अध्यक्ष लक्ष्मणराव अंत्रे व शेतकरी. **(छाया : सुनिल पांढरे)**

श्रीरामपूरच्या प्रांत कार्यालयात काल राहुरी तालुक्यातील सोनगाव येथील शेतकऱ्यांना जमिनीच्या नुकसानभरपाईचे वाटप करण्यात येणार होते. शेतकऱ्यांनी ते सामुहिकरित्या नाकारले. या महामार्गासंदर्भात नोव्हेंबर २०२१ मध्ये राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरणाने नोटिफिकेशन काढले होते. त्यानंतर शेतकऱ्यांच्या जमिनीचे तसेच घरे, गोठा, शेड, विहीर, फळबागा याचे मूल्यांकन कृषी, महसूल, बांधकाम, वनविभागाने केले. प्रांतांनी नियमानुसार या मूल्यांकनाची तपासणी केली. यात दोन वर्षे गेली. त्यानंतर २०२४ मध्ये भारतमाला योजना बंद झाल्यामुळे हा प्रकल्प थांबविण्यात आला. शेतकऱ्यांच्या जमिनीवर एनएचआयचा फेर पडल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळणे मुश्कील झाले. प्रकल्प रखडल्याने जमिनीची खरेदी-विक्री करता येईना. २०२५च्या शेवटी प्रकल्पाला पुन्हा गती मिळाली. २०२६ मध्ये महामार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली. परंतु एनएचआयने आधी शेतकऱ्यांना केवळ जमिनीचे पैसे देण्याचे ठरविले. जमिनीवरील सेट्सचे पैसे पुन्हा तपासणी करून देऊ, असे कारण सांगितले. ते शेतकऱ्यांना मान्य नाही. याचा निषेध करण्यासाठी शेतकऱ्यांनी काल प्रांत ऑफीसला येत प्रांताधिकारी किरण सावंत यांना निवेदन दिले. यावेळी सोनगावसह सात्रळ, कानडगाव, कनगर, वांबोरी आदी गावांतील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

यावेळी बोलताना महामार्ग संघर्ष समितीचे प्रमुख लक्ष्मणराव अंत्रे म्हणाले, मूल्यांकन काढण्यासाठी प्रांतांची नियुक्ती केंद्र सरकारनेच केली. आता त्यांनी काढलेले व्हॅल्युएशन सरकारला मान्य नाही. जमिनी कवडीमोल भावाने घेतल्या, सेटचे पैसे सोडा, जमिनीवरील घर, गोठा, झाडे सॅटेलाईट मॅपमध्ये येऊनदेखील त्याचे व्हॅल्युएशन स्वीकारायला एनएचआय तयार नाही. जमिनीचे पैसे मिळायला सहा वर्षे लागली. सेटचे पैसे मिळायला आणखी सहा वर्षे लागतील.

शेतकरी उद्धस्त करणाऱ्या एनएचआयच्या कारभाराचा आम्ही निषेध करतो. गणेश अंत्रे म्हणाले, २३ लाख रुपये एकर बागाईत जमीन मिळत असेल, तर मंत्री गडकरी साहेब तुम्ही घेऊन द्या, आम्ही पैसे देऊ. कुंभमेळ्यासाठी कोट्यवधी रुपये द्यायला सरकारकडे पैसे आहेत; इकडे शेतकऱ्याची काळी आई, घरदार उद्धस्त करताना कवडीमोल भाव दिला जात आहे. शेतकऱ्यांच्या मुंडक्यावर पाय देऊन यांना विकास पाहिजे असेल, तर आम्ही तो होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

#### नुकसानभरपाई पेक्षा विष द्या

आंदोलनात सहभागी होण्यासाठी आलेल्या निर्मला तुळशीराम अनाप म्हणाल्या, माझ्या पतीचे निधन झाले आहे. अवघी ३९ गुंठे शेती, त्यात सात गुंठे रस्त्यात जात आहेत. बोअर, विहीर, सायफन रस्त्यात गेले. नुकसानभरपाई मिळत आहे, अवघी चार लाखांची. मुला-मुलींच्या शिक्षणासाठी मी ३०० रुपये रोजाने मी शेतात कामाला जाते. उरलेल्या वेळात शेती करते. आता विहीर बोअर गेल्यामुळे शेती करणार कशी? चार गुंठ्याच्या कवडीमोल भरपाईत पुन्हा मला जमीन तरी मिळेल. नुकसानभरपाईच्या नावाखाली सरकारने आमची थट्टा लावली आहे. या कवडीमोल पैशापेक्षा आम्हाला विष द्या, असा उद्वीग्न सवाल करताना अनाप यांचे डोळे पानावले.

#### शेतकऱ्यांच्या मागण्या काय?

-जमीन व सेटची नुकसानभरपाई एकत्र द्या

-बाजारभावानुसार जमिनीची भरपाई द्या

-प्रांतांनी केलेले सेटचे मूल्यांकन योग्य, तेच स्वीकारा

-एक महिन्यात नुकसानभरपाई द्या, अन्यथा हायवे दुसरीकडून न्या.

#### शेतकरी उद्धस्त करणारा विकास काय कामाचा?

नुकसान भरपाई देताना शासन नियम लावत आहे, परंतु नियम शेतकऱ्यांचे भले करणारे असावे, एनएचआयचा कारभार आणि नियम शेतकऱ्यांना उद्धस्त करणारा आहे. रस्ते विकास देशाचे भले करणारा असतो, म्हणून आम्ही इतके दिवस शांत होतो; पण शेतकरी उद्धस्त करणारा हा रस्ते विकास काय कामाचा? लक्ष्मण अंत्रे, अध्यक्ष, महामार्ग संघर्ष समिती

## श्रीगोंद्यात सोनसाखळी चोरट्यांचा धुमाकूळ; वृद्ध महिला गंभीर जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. गुरुवारी (दि. २९) सायंकाळी टाकळी-श्रीगोंदा रस्त्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी ६५ वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील एक तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावले. या झटापटीत तोल जाऊन रस्त्यावर पडल्याने महिला गंभीर जखमी झाली.

कांताबाई हौसराव मखरे (वय ६५, रा. साळवण देवी रस्ता, श्रीगोंदा) या गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास साळवण देवी मंदिरातून दर्शन घेऊन घरी जात होत्या. टाकळी-श्रीगोंदा रस्त्यावर पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोघांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून वेगाने पलायन केले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे कांताबाई रस्त्यावर पडल्या. त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्या बेशुद्ध झाल्या. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते नाना शिंदे यांनी जखमी महिलेला मदत केली. त्यानंतर त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक कौशलरामनिरंजन वाघ व पोलीस उपनिरीक्षक कडू यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मुलगा अंबादास मखरे यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### संशयित सीसीटीव्हीत कैद

घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन्ही संशयित दुचाकीस्वार कैद झाले आहेत. फुटेजच्या आधारे पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. शहरात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, चोरट्यांना तातडीने पकडण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पोक्सो गुन्ह्यातील गणेश खांडवेची निर्दोष मुक्तता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : येथील अल्पवयीन मुलींशी संबंधित पॉक्सो प्रकरणात अहमदनगर येथील विशेष पॉक्सो न्यायालयाने आरोपी गणेश तुकाराम खांडवे यांची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली. विशेष न्यायाधीश केदार एस. कुलकर्णी यांनी नुकताच हा निकाल दिला. आरोपीच्या वतीने ॲड. करण मुसमाडे यांनी न्यायालयात बाजू मांडली.

राहुरी पोलीस ठाण्यात २०२५ मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने भारतीय न्याय संहिता, पॉक्सो कायदा तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत आरोपी विरुद्ध खटला चालविण्यात आला होता. न्यायालयाने या प्रकरणात एकूण सहा साक्षीदार तपासले. न्यायालयीन निर्णयानुसार, फिर्यादी पक्षातील महत्त्वाच्या साक्षीदारांच्या साक्षीतून अभियोजन पक्षाच्या आरोपांना अपेक्षित समर्थन मिळाले नाही. न्यायालयाने उपलब्ध साक्षीपुरावे आणि कागदपत्रांचा विचार केला. केवळ औपचारिक साक्षीदारांच्या पुराव्याच्या आधारे आरोपी विरुद्ध दोष सिद्ध होत नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.

आरोपीच्या बचाव पक्षा तर्फे ॲड. करण मुसमाडे व व्ही के मुसमाडे यांनी अभियोजन पक्षाकडे दोष सिद्ध करण्यासाठी पुरेसा आणि ठोस पुरावा नसल्याचा युक्तिवाद केला. तसेच साक्षीदारांच्या जबाबांमधील बाबी आणि न्यायालयात सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांकडे लक्ष वेधण्यात आले. अभियोजन पक्षाला आरोपी विरुद्धचे आरोप सिद्ध करता आले नाहीत, असा निष्कर्ष न्यायालयाने नोंदविला. त्यामुळे आरोपी गणेश तुकाराम खांडवे यांची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश देण्यात आला.

या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. करण मुसमाडे यांनी युक्तिवाद केला त्यांना ड. वैष्णवी मुसमाडे, विजया कोतकर यांचे सहकार्य लाभले. न्यायालयाने पुराव्यांचे केलेले मूल्यमापन हा निकालातील महत्त्वाचा भाग ठरला.

या निकालामुळे खांडवे कुटुंबीयांना योग्य न्याय मिळाला. हा विजय म्हणजे सत्याचा विजय आहे. अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. तर खांडवे कुटुंबीयांनी न्यायालयाचे आभार मानले.

## घरातील पर्समधून ८० हजारांची रोकड, मोबाईल लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील चिंचोली फाटा येथे महिलेच्या भाड्याच्या घरातून ८० हजार रुपयांची रोकड, मोबाईल आणि पर्स असा एकूण ९८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैशाली सुकलाल वाघ (वय ३५, रा. चिंचोली फाटा) या जत्रांमध्ये खेळणी व बांगड्यांचे दुकान लावून उदरनिर्वाह करतात. २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास त्या मुलगी शोभा आणि परिचित पोपट आप्पासाहेब पोकळे यांच्यासोबत श्रीरामपूर येथून मोटारसायकलवरून घरी आल्या होत्या. घरी आल्यानंतर त्यांनी जत्रेतील व्यवसायातून मिळालेले ८० हजार रुपये आणि विवो वाय ११ ५जी कंपनीचा मोबाईल काळ्या रंगाच्या पर्समध्ये ठेवून ती भिंतीवरील खिळ्याला अडकवली होती. त्यानंतर सर्वांनी एकत्र जेवण केले. रात्री नऊच्या सुमारास पोपट पोकळे निघून गेले. रात्री अकराच्या सुमारास वैशाली वाघ व त्यांची मुलगी झोपी गेल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता उठल्यानंतर मोबाईल घेण्यासाठी गेल्या असता पर्स जागेवर दिसून आली नाही. घरात व परिसरात शोध घेऊनही ती मिळाली नाही. चोरीस गेलेल्या पर्समध्ये ८० हजार रुपये रोख, अंदाजे १८ हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि २०० रुपये किमतीची पर्स असा एकूण ९८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल होता. वैशाली वाघ यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक १२०८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## भोकर ग्रामपंचायतीत सरपंच विरुद्ध सदस्य संघर्ष; कमिशन मागणीच्या आरोपाने खळबळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर ग्रामपंचायतीमध्ये सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांमधील वाद चव्हाट्यावर आला आहे. सरपंच सौ. शीतल प्रताप पटारे या विकासकामांच्या कार्यारंभ आदेशासाठी आर्थिक मागणी करीत असल्याने गावातील विकासकामे गेल्या अडीच वर्षांपासून रखडल्याचा गंभीर आरोप उपसरपंच गिरीश मते यांच्यासह १३ ग्रामपंचायत सदस्यांनी केला आहे. या प्रकरणी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह विविध शासकीय कार्यालयांकडे निवेदन देऊन चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, दलित वस्ती, १५ वा वित्त आयोग आणि जनसुविधा योजनेंतर्गत मंजूर विकासकामांची निविदा प्रक्रिया ग्रामसभेच्या ठरावानुसार राबविण्यात आली. २२ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या, तर १ ऑक्टोबर रोजी निविदा उघडण्यात आल्या. मात्र, निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काही ठेकेदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आले, तर काहींचे आदेश रोखण्यात आल्याचा आरोप सदस्यांनी केला आहे. काही ठेकेदारांकडे कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी सरपंच पतींकडून नऊ टक्के कमिशनची मागणी करण्यात आल्याची तक्रार ठेकेदारांनी केल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच ग्रामपंचायतीतील किरकोळ कामांच्या बिलांवर स्वाक्षरी करण्यासाठीही २०० ते ३०० रुपयांची मागणी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सरपंच व सरपंच पतींकडून सदस्य आणि तक्रारदार ग्रामस्थांना धमकावले जात असल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीचे कामकाज विस्कळीत झाल्याचे सदस्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा ग्रामस्थ व ग्रामपंचायत कार्यकारी मंडळाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. पालकमंत्री, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीरामपूरचे गटविकास अधिकारी, तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. निवेदनावर माजी उपसरपंच सागर आहेर, उपसरपंच गिरीश मते यांच्यासह माया राक्षे, काळू गायकवाड, हिराबाई खंडागळे, संगीता अभंग, सीमा विधाटे, संजीवनी काळे, संदीप गांधले, मीना अबुज, छाया आहेर, विजय अमोलिक व मयूर काळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बावीस वर्षीय तरुणीचे अज्ञात इसमांकडून अपहरण ; गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : २२ वर्षीय तरुणीला कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याची घटना दि. २९ ऑक्टोबर रोजी राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द परिसरात उघडकीस आली. या घटने बाबत राहुरी पोलिस ठाण्यात अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेतील एक २२ वर्षीय तरुणी तीच्या कुटुंबासह राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द परिसरात राहते. दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११ वाजता पिडीत मुलगी व तीच्या कुटुंबातील इतर लोकं जेवण करून झोपी गेले होते. दि. २९ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.३० वाजे दरम्यान पिडीत तरुणी घरातून गायब झाल्याचे लक्षात आले. नातेवाईकांनी तीचा परिसरात व आजूबाजूला शोध घेतला. मात्र ती कोठेही मिळून आली नाही. पिडीत तरुणीला कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणांकरीता फुस लावुन पळुन नेले, अशी नातेवाईकांची खात्री झाली. तरुणीच्या नातेवाईकांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. १२०५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १४०(३) प्रमाणे अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीत विखे-गडाख एकाच व्यासपीठावर

### सहकार विकास मंडळासाठी एकजुट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकारणात महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. एकमेकांचे राजकीय विरोधक म्हणून ओळखले जाणारे विखे आणि गडाख गट एकाच व्यासपीठावर आल्याने राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले गेले.

सोनई येथील आमराई परिसरात माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या प्रमुख उपस्थितीत मतदारांची संयुक्त बैठक पार पडली. विशेष म्हणजे, माजी खासदार सुजय विखे यांनी स्वतः सूत्रसंचालनाची जबाबदारी स्वीकारत सर्व उमेदवारांची ओळख करून दिली. आरोप-प्रत्यारोप टाळत अत्यंत साध्या पद्धतीने झालेल्या या बैठकीत सहकार विकास मंडळाच्या उमेदवारांना एकत्रित मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी शंकरराव गडाख म्हणाले, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि माजी खासदार सुजय विखे यांच्या विचारातून ११ संचालक बिनविरोध निवडून देण्यात आले. शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध गटांचे नेते एकत्र आले असून, ही मोठी जबाबदारी आहे. इथेनॉल उत्पादनाबाबतच्या निर्णयांमुळे साखर कारखानदारी आर्थिक अडचणीत सापडली आहे.

अशा परिस्थितीत कौशल्यपूर्ण नियोजनातून बँकेचा कारभार अधिक सक्षम करावा लागणार आहे. सर्व मतभेद बाजूला ठेवून सहकार विकास मंडळाच्या आघाडीला मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

माजी खासदार सुजय विखे म्हणाले, ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्हा बँकेने सक्षम बँक म्हणून लौकिक टिकवून ठेवला आहे. बँकेला अधिक सक्षम करण्यासाठी शंकरराव गडाख यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण आहे. निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी सर्वांची इच्छा होती. सहकाराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार मोनिका राजळे, वैभव पिचड, अनुराधा नागवडे, संगीता वाघ, रणजित देशमुख, गणपतराव सांगळे, सचिन जगताप,जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुनील गडाख,युवा नेते उदयन दादा गडाख, ह भ प विश्वासराव गडाख, आदी मान्यवर उपस्थित होते. आभार उमेदवार कारभारी जावळे यांनी मानले.

## दिवसा ढवळ्या शेळीवर बिबट्याचा हल्ला, शेतकरी बचावला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : येथील मच्छिंद्र गंगाधर पटारे यांचे घुमनदेव रोड येथील ३५३ गट नंबर मध्ये काल सायंकाळी दिवसा ढवळ्या ६ वाजण्याच्या दरम्यान शेतामध्ये चरत असलेल्या शेळीवर बिबट्याने हल्ला करून तिला जखमी केले. त्यामुळे दिवसा ढवळ्या झालेल्या घटनेमुळे टाकळीभान परिसरात खळबळ उडाली आहे. शेतात शेळ्या चारत असलेले शेतकरी मच्छिंद्र पटारे यांनी शेतालगत असलेल्या ओढ्यातून अचानकपणे आलेल्या बिबट्याने धरलेली शेळी पाहून त्या दिशेने धाव घेतली व बिबट्याला मोठ्या हिमतीने सामोरे जाऊन काठी मारल्याने बिबट्या पळाला, त्यामुळे तेथील चरणाऱ्या शेळ्या धादरून गेल्या मात्र बिबट्याच्या हल्लयात नशिबाने शेळी बचावली परंतु शेळीच्या मानेला बिबट्याने चावा घेतल्याने शेळी गंभीर जखमी झाली आहे.

या दिवसाढवळ्या झालेल्या घटनेमुळे घूमनदेव रोडवरील राहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये बिबट्याची भीती पसरली आहे. तरी पिंजरा लावून सदर बिबट्या जेरबंद करावा अशी जोरदार मागणी येथील नागरिकांनी केली आहे. अन्यथा बिबट्यांपासून मानव जातीलाही धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे

या अगोदरही शेतकरी मच्छिंद्र पटारे यांची एक शेळी बिबट्याने ठार केली होती. या परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असून या भागात बिबट्याचे दहशतीचे वातावरण पसरले आहे. या रोडवरील अनेक वस्त्यांवरील पाळीव कुत्रे, शेळ्या, बिबट्याने ठार केल्या आहेत. तसेच दोन दिवसापूर्वी टाकळीभान खिंर्डी रोडवरील संदीप गांगुर्डे यांच्या वस्तीवर देखील सायंकाळी आठ वाजता बिबट्याचे दर्शन झाले होते. त्यामुळे टाकळीभान येथे बिबट्यांचे प्रमाण वाढले असून वन विभागाने बिबटे जेर बंद करावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.